cmyk

दैनिक
राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२०१ | मंगळवार दि.१८ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

लोकशाहीचं अवमूल्यन!

बिहारची निवडणूक जाहीर होताच राजकारणात खळबळ माजणार हे माहीत होतं; पण एवढ्या मोठ्या आर्थिक उलाढालीचा स्फोट निवडणुकीच्या तोंडावर होईल, याची कल्पना कुणालाच नव्हती. आचारसंहिता लागू होण्याच्या अवघ्या एका तास आधी तब्बल १४ हजार कोटी रुपये काढले गेले आणि १.२५ कोटी महिला मतदारांच्या खात्यात प्रत्येकी १० हजार रुपये जमा झाले.

थोडक्यात...

मुख्यमंत्र्यांसह, योगींनी केले सेनाप्रमुखांना अभिवादन

◆ मुंबई : १७ नोव्हेंबर रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा तेरावा स्मृतीदिन होता. त्यानिमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शिवसेनाप्रमुखांना आदरांजली वाहिली. सोशल मीडियावर पोस्ट करून अमित शहा म्हणाले की, राष्ट्रवादी विचारसरणीचे प्रखर पुरस्कर्ते आणि सनातन संस्कृतीचे खंदे पहारेकरी आदरणीय बाळासाहेब ठाकरेजींच्या पुण्यतिथीस त्यांना श्रद्धापूर्वक नमस्कार. प्रत्येक राष्ट्रप्रेमीसाठी ते मूल्यधारित राजकीय आयुष्याची प्रेरणा आहेत. पुण्यतिथीच्या निमित्ताने बाळासाहेबांना कोटी कोटी नमन! असे अमित शहा म्हणाले.

बारमध्ये अश्लील नृत्य पाहणे गुन्हा नाही

◆ मुंबईः डान्स बारवरील कारवाईसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने एक मोठा निर्णय दिला आहे. एखाद्या बारमध्ये नृत्यांगना डान्स करत असेल आणि तेथे एखादा ग्राहक उपस्थित असेल, तर केवळ उपस्थितीमुळे तो गुन्हेगार ठरत नाही, असे स्पष्ट मत न्यायालयाने नोंदवले आहे. या निर्णयाने मुंबई पोलिसांना मोठा धक्का दिला असून, चेंबूर येथील एका ग्राहकावरील आरोपपत्र कोर्टाने रद्द केले आहे. ५ मे २०२४ च्या रात्री सुरभी पॅलेस बार आणि रेस्टॉरंटमध्ये पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात एका व्यक्तीला अटक करण्यात आली होती. गुप्त माहितीच्या आधारावर टाकलेल्या या छाप्यात रेस्टॉरंटचा मॅनेजर, ऑर्केस्ट्रा कलाकार आणि अनेक ग्राहकांसह ११ लोकांना ताब्यात घेण्यात आले होते. पोलिसांनी आरोप केला होता की तेथे उपस्थित असलेल्या महिला अश्लील नृत्य करत होत्या.

शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण ठाकरेंवर गुन्हा

◆ मुंबईः मुंबईच्या नेरूळमधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरणावरून राजकारण तापल्याचे पाहायला मिळत आहे. मनसे नेते अमित ठाकरे यांनी नेरूळमधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केल्याप्रकरणी त्यांच्यासह जवळपास ७० मनसैनिकांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. यावरून आता आरोप-प्रत्यारोपही सुरू आहेत. दरम्यान, यावरून नवी मुंबईतील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे आहेत. महाराजांसाठी माझ्यावर पहिला गुन्हा दाखल झाला बरं वाटलं'', असे अमित ठाकरे यांनी म्हटले.

सेना आमदारांविरुद्ध अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा प्रचार

◆ धाराशिव : धाराशिव विधानसभा निवडणुकीत आम्ही महायुती म्हणून एकत्र लढत असताना देखील शिवसेनेच्या ६० आमदारांविरोधात अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीने एकत्र येत विरोधात काम केले आहे, असा गौप्यस्फोट शिवसेना नेते तानाजी सावंत यांनी केला आहे. मतदारसंघातील भूम-परंडा-वाशी नगरपालिका निवडणुकांच्या प्रचारात त्यांनी हा आरोप केला. सावंत यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसवर बोचरी टीका करत स्वबळाचा नारा दिला होता. सावंत यांच्याविरुद्ध निवडणूक लढवलेल्या राहुल मोटेंनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर, सावंत यांनी नगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने आयोजित मेळाव्यात महायुतीमधील राष्ट्रवादीवर सडकून टीका केली होती. त्यानंतर, आता पुन्हा एकदा तानाजी सावंत यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीवर गंभीर आरोप केले आहेत.

'आत्मा' योजनेसाठी ३५.७९ कोटी मंजूर

शेती आधुनिक करण्यासाठी ठरणार फायदेशीर

पुणे । प्रतिनिधी

राज्य शासनाने सोमवारी (दि.१७) केंद्राच्या 'आत्मनिर्भरता कृषी तंत्रज्ञान व प्रशिक्षण अभियान' (आत्मा) योजनेअंतर्गत २०२५-२६ या वर्षातील दुसऱ्या हप्त्यासाठी एकूण ३५ कोटी ७९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. सर्वसाधारण प्रवर्गासाठी २७ कोटी, अनुसूचित जातींसाठी ४.८७ कोटी आणि अनुसूचित जमातींसाठी ३.८५ कोटी असे वाटप करण्यात येणार आहे. या निधीमुळे राज्यातील कृषी विस्तार यंत्रणा बळकट होऊन शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि

प्रात्यक्षिके अधिक प्रभावीपणे उपलब्ध होणार असल्याचे शासनाने म्हटले आहे.

'आत्मा' म्हणजे जिल्हा स्तरावर चालणारी कृषी विस्तार सुधारणा योजना असून तिचा उद्देश शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षणाद्वारे सक्षम बनवणे हा आहे. या योजनेखाली शेतकरी प्रशिक्षण, शिबिरे, कृषी मेळावे, नवीन पिकांवरील प्रयोग आणि महिला शेतकऱ्यांसाठी कार्यक्रम राबवले जातात. विविध कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र आणि शेतकरी गटांचा समन्वय साधून ही योजना जिल्हा कृषी अधिकारी आणि तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांमार्फत अमलात आणली जाते. यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन वाढवण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व तंत्रज्ञान सहज ▶▶ पान २ वर

अशा पद्धतीने होणार फायदे

या योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, शेतकरी गटांना मजबूत करणे, महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, मातीची तपासणी अशा गोष्टींवर काम करता येईल. विशेष म्हणजे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र निधी असल्याने त्यांच्या सर्वांगीण विकासाला मदत होणार आहे.

बिबट्यांची होणार नसबंदी केंद्र सरकारने दिली मान्यता

पुणे । प्रतिनिधी

बिबट्यांना खाद्य म्हणून आता शेतात अन बिबट प्रवण परिसरात शेळ्या सोडण्यात येणार आहेत. त्यामुळे मानवा वरील हल्ले कमी होण्यास मदत होईल. तसेच बिबट्याच्या नसबंदीसाठी केंद्र सरकारकडून परवानगी मिळाल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली. पुणे शहरातील वनविभागाच्या मुख्यालयात त्यांनी अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. या बैठकीत पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील वाढत्या बिबट्यांच्या हल्यांबाबत आढावा घेत कृती आराखडाही दिला.

वनमंत्री नाईक यांनी सोमवारी सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत पुण्यातील वनविभागाच्या मुख्यालयात बिबट्यांच्या मानवी वस्तीतील वाढत्या हल्ल्यांबाबत आढवा बैठक घेतली. यात पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक ▶▶ पान २ वर

तर स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक रद्द होईल !

सुप्रीम कोर्टाकडून दोन दिवसात उत्तर देण्याचे राज्य सरकारला आदेश

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या प्रक्रियेत ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर सुप्रीम कोर्टाने रविवारी (१७ नोव्हेंबर) राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाला कठोर इशारा दिला आहे. न्यायमूर्ती सूर्या कांत आणि ज्योमल्या बाघची यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, 'कोर्टाच्या अधिकारांची परीक्षा घेऊ नका. ५० टक्क्यांची

आरक्षण मर्यादा ओलांडता येणार नाही. २०२२ च्या जे.के. बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वीची स्थिती कायम राहील.' या निर्णयामुळे ३० ते ४० नगरपालिका आणि नगरपरिषदांमध्ये ओबीसी आरक्षण ५० टक्के पेक्षा जास्त गेले असल्यास ते रद्द होण्याची शक्यता आहे.

कोर्टाने म्हटले की, राज्य सरकार आणि आयोगाने घटनापीठाच्या ६ मे २०२५ च्या आदेशाचा विपर्यास करू नये. चालू निवडणूक प्रक्रियेचा हवाला देऊन मर्यादा ओलांडता येणार नाही. जर असे केले तर कोर्ट निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करेल आणि थांबवेल. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्या विनंतीवर पुढील सुनावणी १९ नोव्हेंबरला ठेवण्यात आली असून, राज्य सरकारने दोन दिवसांत आपली भूमिका स्पष्ट करावी, असे कोर्टाने सांगितले. सुप्रीम कोर्टाने मे २०२५ मध्ये ओबीसी आरक्षणाला मंजुरी दिली होती, पण आयोगाच्या अहवालानुसार २७ टक्के कोटा लागू ▶▶ पान २ वर

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना फाशीची शिक्षा

ढाका । वृत्तसंस्था

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्यावर सुरू असलेल्या खटल्यांची अंतिम सुनावणी सोमवारी (दि. १७ नोव्हेंबर) पार पडली आहे. विविध गुन्ह्यांमध्ये दोषी ठरलेल्या हसीनांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. शेख हसीना यांच्यावर बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणात प्राणघातक कारवाईच्या संदर्भात खटला सुरू

होता.

याच प्रकरणी आता इंटरनॅशनल क्राइम ट्रिब्युनलने त्यांना दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली आहे. त्यांच्याविरुद्धचा पहिला आरोप खून, हत्येचा प्रयत्न, छळ आणि इतर अमानवी कृत्यांशी संबंधित आहे. दुसऱ्या आरोपात असा दावा आहे की, हसीना यांनी आंदोलकांना संपवण्याचे आदेश दिले. या आरोपांमध्ये विद्यार्थ्यांना प्राणघातक शस्त्रे वापरण्याचे निर्देश देणे आणि प्रक्षोभक भाषणे देणे यांचा समावेश आहे. इतर आरोपांमध्ये सहा निःशस्त्र आंदोलकांची हत्या आणि गोळीबार यांचा समावेश आहे. कोर्टाने शेख हसीना ▶▶ पान २ वर

भाजप नगराध्यक्ष पदाचे जिल्ह्यातील उमेदवार गोपीनाथ गडावर नतमस्तक

परळी वै.। वार्ताहर

भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्ष पदासाठी रिंगणात उतरलेल्या जिल्ह्यातील सर्व उमेदवारांनी सोमवारी गोपीनाथ गडावर येऊन लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सर्व उमेदवारांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

नगरपरिषद निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा सोमवारी शेवटचा दिवस होता. जिल्ह्यातील सहा पैकी पाच ठिकाणी भाजपचे उमेदवार रिंगणात उतरले आहेत तर परळीत महायुतीचा उमेदवार आहे. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे (बीड), नंदकिशोर मुंदडा (अंबाजोगाई), गीता भाभी पवार (गेवराई), रामचंद्र निर्मळ (धारूर), संध्या मेंडके (माजलगाव) यांनी सायंकाळी ▶▶ पान २ वर

उद्धव-राज बंधुचे शिवसेनाप्रमुखांच्या स्मृतिस्थळाला एकत्र अभिवादन

मुंबई : प्रतिनिधी

अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिल्यानंतर मतभेद गाडून एकत्र आलेल्या उद्धव व राज ठाकरे या बंधूंनी सोमवारी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजीपार्क येथील स्मृतिस्थळावर एकत्र येऊन अभिवादन केले. दोन्ही भावांनी एकत्र यावे ही ▶▶ पान २ वर

सौदी अरबमध्ये भीषण अपघात

४२ भारतीयांचा होरपळून मृत्यू

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

सौदी अरेबियाला हज यात्रेसाठी गेलेल्या भारतीयांवर काळाने घाला घातला आहे. मक्काहून मदीनाकडे जाताना भारतीय प्रवाशांच्या बसला एका डीझेल टँकरने जोरात धडक दिली. मध्यरात्री दीड वाजता टँकर अन् बसची जोरात धकड झाली. बसमधील सर्वजण झोपेत असतानाच काळाने घाला घातला अन् क्षणात परिसरात हाहाकार उडाला. बसमधील ४२ जणांचा होरपळून मृत्यू झाला.

त्यांच्या किंकाळ्याने परिसर हादरून गेला होता. मृतामधील भाविक हे हैदराबादमधील अधिक असल्याचे समजते.

मक्काहून मदीना निघाले, वेळ रात्री दीड वाजता. बसमधील महिला, मुले अन् इतर सर्वजण झोपेत होते. पण त्याचवेळी मुहरासजवळ डिझेल टँकरने जोरात धडक दिली अन् दोन्ही ▶▶ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ नोव्हेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू:३२.०० क्विंटल			
	२,११०	२,९९५	२,६३४
ज्वारी/हायब्रिड : ५०.०० क्विंटल			
	२,३५१	३,५००	३,०९२
मका/लोकल: ५०.०० क्विंटल			
	१,९५०	१,९५०	१,९५०
तूर : १५.०० क्विंटल			
	६,००१	६,६०१	६,३०१
उडीद : ३.०० क्विंटल			
	४,६००	४,६००	४,६००
बाजरी: ८६.०० क्विंटल			
	२,३००	३,८००	२,८१९
मुग: ०.५० क्विंटल			
	५,३०१	५,३०१	५,३०१
सोयाबीन: ८७.०० क्विंटल			
	४,४५०	४,६५०	४,५८७
हरभरा: ०.५० क्विंटल			
	४,८०२	४,८०२	४,८०२

राज्यात आणखी एक ५०० कोटींचा घोटाळा !

मुंबईतील ५०० कोटींचे रुग्णालय अजित पवारांच्या पुतण्याला– अंजली दमानियांचा गंभीर आरोप

मुंबई । प्रतिनिधी

गोवंडी येथे बीएमसीने सार्वजनिक निधीतून तब्बल ५०० कोटी रुपये खर्चून उभारलेले ५८० खाटांचे अत्याधुनिक मल्टी-स्पेशालिटी रुग्णालय आता खासगीकरणाच्या गर्तेत ढकलले जाण्याच्या प्रयत्नात असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. या प्रकरणात त्यांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर बोट ठेवले आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार हे अमेडिया या त्यांच्या कंपनीच्या माध्यमातून पुण्यातील मुंढवा येथील ४० एकर जमीन खरेदी करत



असतानाच हे प्रकरण प्रसिद्धीझोतात आले. यानंतर या प्रकरणातील कथित घोटाळा पुढे आला आणि पार्थ पवारांना हा व्यवहार थांबवावा लागला. मात्र, या व्यवहारावरून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अजित पवारांवर सडकून टीका केली होती. तसेच त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. आता पुन्हा एकदा दमानिया यांनी अजित पवारांवर आरोप केले आहेत. मुंबई महापालिकेच्या गोवंडीमधील शताब्दी रुग्णालयावरून दमानिया यांनी अजित पवारांवर निशाणा साधला आहे. मुंबई महानगरपालिकेने ५०० कोटी रुपये खर्च करून बांधलेले शताब्दी रुग्णालय पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) या तत्वानुसार चालवण्यासाठी तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टने रस दाखवला असल्याची एक बातमी नुकतीच एका नामवंत वृत्तपत्राने प्रसिद्ध केली होती. ▶▶ पान २ वर

लाल किल्ला स्फोट प्रकरणातील नऊ एमएम कॅलिबरची काडतुसे जप्त

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

नवी दिल्लीतील लाल किल्ला परिसराजवळील कार स्फोट प्रकरणाच्या तपासात घटनास्थळावरून जप्त केलेली तीन काडतुसे (दोन जिवंत आणि एक रिकामे) ९ एमएम कॅलिबरची आहेत. लष्करासाठी वापरल्या जाणाऱ्या या गोळ्या नागरिकांच्या ताब्यात ठेवण्यास प्रतिबंधित आहे. दरम्यान, १० डिसेंबरला घडलेल्या स्फोटासाठी वापरलेली गाडी उमर नबीच चालवत असल्याचे डीएनए चाचणीवरून स्पष्ट होत आहे. या स्फोटासाठी उमर नबीला कार घेऊन देणारा आमीर रशीद अली याला एनआयएने ताब्यात घेतले आहे. एनआयएने आतापर्यंत जखमींसह ७३ साक्षीदार तपासले आहेत.

आमीर कार खरेदी करून देण्यासाठी

काश्मिरातील पंपोरे येथून दिल्लीत आला होता. त्याला आत्मघाती स्फोटाची कल्पना होती. स्फोटानंतर काही तासांतच जम्मू-काश्मीर पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या होत्या. त्यांच्याकडून एनआयएने ताबा मिळवला. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, या काडतुसांचा वापर सहसा सशस्त्र दलांकडून किंवा विशेष परवानगी ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

लोकशाहीचं अवमूल्यन !

बिहारची निवडणूक जाहीर होताच राजकारणात खळबळ माजणार हे माहीत होतं; पण एवढ्या मोठ्या आर्थिक उलाढालीचा स्फोट निवडणुकीच्या तोंडावर होईल, याची कल्पना कुणालाच नव्हती. आचारसंहिता लागू होण्याच्या अवघ्या एका तास आधी तब्बल १४ हजार कोटी रुपये काढले गेले आणि १.२५ कोटी महिला मतदारांच्या खात्यात प्रत्येकी १० हजार रुपये जमा झाले. या गंभीर आरोपाने बिहारच्या राजकारणाला अक्षरशः हादरवून टाकलं आहे. हे आरोप सामान्य राजकीय टोमणे नव्हेत; तर शासन-प्रशासन यंत्रणेत उच्च पातळीवर काम केलेल्या जनसुराज पक्षाचे प्रवक्ते पवन वर्मा यांनी केले आहेत. त्यामुळे हे आरोप फेटाळण्यापेक्षा ते तपासले जाणे हीच लोकशाहीची किमान अपेक्षा ठरते.

प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाला शून्य जागा मिळाल्यानंतर वर्मा यांनी ही माहिती मांडली. पण ही माहिती पराभवाचा राग नाही; तर शासनाच्या आर्थिक नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह उभं करणारा आरोप आहे. राज्याचा खजिना रिकामा असल्याचं सरकारनंच काही महिन्यांपूर्वी सांगितलं होतं. बिहार राज्याचं कर्ज चक्क ४,०६,००० कोटी पर्यंत पोहोचलं असून रोजचं व्याज ६३ कोटी रुपये आहे, असा वर्मा यांनी दिलेला आकडा भीतीदायक आहे. ज्याचे व्याजच दररोज अब्जो रुपये खातं, ते राज्य निवडणुकीच्या तोंडावर १४ हजार कोटी रुपये कसे काय खर्च करू शकतं? हा प्रश्न टाळता येणार नाही. पण या कथेतला सर्वात धक्कादायक भाग म्हणजे निधीचा स्रोत. वर्मा यांनी दावा केला आहे की जागतिक बँकेकडून दुसऱ्या प्रकल्पासाठी घेतलेला पैसा महिलांना वाटण्यात आला. हे खरं ठरलं, तर हा केवळ निवडणूक गैरप्रकार नाही, तर राष्ट्राची आर्थिक प्रतिमा डागाळणारा गुन्हा आहे. जागतिक आर्थिक संस्थांकडून घेतलेला पैसा निवडणुकीत ''बेनिफिट ट्रान्सफर'' म्हणून वापरणं म्हणजे आंतरराष्ट्रीय करारांचं, नियमनांचं आणि देशाच्या विश्वासार्हतेचं सरळ उल्लंघन. कोणत्याही राज्याने असं पाऊल उचलणं म्हणजे आर्थिक अराजकतेचं दार उघडणं आहे.

महिला रोजगार योजनेअंतर्गत रक्कम जमा झाली, एवढंच सरकार सांगतं. पण कोणत्या निकषांवर? कोणत्या तरतुदीनुसार? आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आचारसंहिता लागू होण्याच्या नेमक्या तासाभर आधीच का? या प्रश्नांची उत्तरं देणं टाळणं म्हणजे संशय अधिकच पक्का करणं. लोकशाहीत सरकारची शांतता ही कधीही सद्भावनेची नसते; ती बहुतेकदा सत्य दडवण्याची चिन्हे असतात. या प्रकरणात दुसरा मुद्दा अधिक व्यापक आहे. प्रशांत किशोर यांना पर्यायाची भाषा बोलताना बिहारने संधी दिली नाही. विचाराची भाषा नाकारली आणि सरकारी लाभांची भाषा स्वीकारली ही निवडणुकीची धक्कादायक दिशा आहे. मतदारांना थेट पैशांद्वारे प्रभावित करणारी प्रथा जर पाय रोवेल, तर उद्याच्या भारतात निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव नव्हे, तर ''लाभ-वितरणाचा बाजार'' ठरेल. विचार, धोरणे, विकास मॉडेल, शासनकौशल्य हे सारे मागे पडेल आणि फक्त पैशांच्या आधारावर निर्णय होऊ लागतील. लोकशाहीचा पाया म्हणजे स्वातंत्र्य; पण पैशाच्या ओझ्याखाली स्वातंत्र्य कधीच टिकत नाही. बिहारचा हा नमुना धोकादायक आहे. आज निधी महिलांना; उद्या कोणत्या समाजघटकाला? आज १४ हजार कोटी; उद्या २० की ३०? जर निवडणुका सरकारी खजिन्याच्या तिजोरीवर अवलंबून राहिल्या, तर सत्तांतर म्हणजे विचारांचं नाही, तर आर्थिक सामर्थ्याचं युद्ध उरेल. आणि ही अवस्था आली, तर लोकशाही केवळ नावापुरती राहील. खरं सत्ता-व्यवहार काही मोजक्या हातात केंद्रित राहील.

या संपूर्ण प्रकरणाचं मूळ म्हणजे जबाबदारीचा प्रश्न कोणाच्या आदेशाने पैसा दिला? पैसा कुठून आला? कोणत्या प्रकल्पाचा निधी वळवला? आचारसंहितेची पायमल्ली का झाली? जागतिक बँकेची मंजुरी किंवा माहिती होती का? ही सर्व उत्तरं शोधण्यासाठी केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप पुरेसे नाहीत. स्वतंत्र, उच्चस्तरीय, न्यायालयीन चौकशी अत्यावश्यक आहे. जे लोकशाहीचं अवमूल्यन करतात, त्यांनी शिक्षेपासून सुटू नये. जे हे अवमूल्यन होताना गप्प राहतात, त्यांनी लोकशाहीवरचे नैतिक हक्क गमावलेलेच असतात. लोकशाही ही विश्वासाची रचना आहे. विश्वास तुटला की निवडणुकीतल्या पेट्याही फक्त लाकडाच्या पेट्या राहतात. बिहारमध्ये आज जे घडलं, ते फक्त एका राज्याची घटना नाही; ते भारतीय लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. समाज उठेल, प्रश्न विचारेल, उत्तरं मागेल तरच लोकशाही वाचेल. नाही तर मतपेट्यांवर प्रामाणिकपणाऐवजी पैशाचं शिक्कामोर्तब होईल.

राष्ट्रवादीच्या उमेदवारांना विजयी करून गेवराई शहराच्या विकासाला बळ द्या-रणवीर पंडित

गेवराई । प्रतिनिधी

विकास हाच आमचा ध्यास असून गेवराई शहराचे कित्येक वर्षांचे प्रलंबित प्रश्न आ.विजयसिंह पंडित यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली निकाली काढले आहेत. यापुढील काळात देखील गेवराई शहराच्या सुंदर आणि भव्यतेसाठी उर्वरित प्रश्नही सोडवले जातील. गेवराई शहर एक स्मार्ट शहर म्हणून ओळखले जाईल. यासाठी गेवराई शहरातील मतदार बंधु-भगिनींनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांसह सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन राष्ट्रवादीचे युवा नेते रणवीर पंडित यांनी केले. वाजत-गाजत आणि शक्ति प्रदर्शन करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रभाग क्र.१ व ५ मधील उमेदवारांनी राष्ट्रवादीचे युवा नेते रणवीर पंडित यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.शितलताई दाभाडे यांच्यासह सर्व उमेदवारांची रॅली काढण्यात आली. यावेळी प्रभाग क्र.१ मधील उमेदवार भास्कर काकडे, विठ्ठल पवार तसेच प्रभाग क्र.५ मधील उमेदवार अशोक छगनराव गायकवाड व सौ.अंजुश्री महेश मोटे यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

गेवराई नगर परिषद निवडणुकीमध्ये आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.शितलताई दाभाडे यांच्यासह सर्व उमेदवारांनी शक्ति प्रदर्शन करत प्रचार रॅली काढली. राष्ट्रवादीचे युवा नेते रणवीर पंडित यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून उपस्थित मतदारांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, माजी नगराध्यक्ष तथा उमेदवार महेश दाभाडे, श्रावणबाळ योजनेचे तालुकाध्यक्ष दादासाहेब घोडके, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते बंडू मोटे, महेश मोटे, विशाल ठाकूर, बाबुराव बेद्रे, समाधान मस्के, अभिषेक गायकवाड, माऊली पंडित, ज्ञानेश्वर दाभाडे, सोनू दाभाडे, अदित्य दाभाडे, रघुनाथ आतकरे, मनोज हजारे, सुभाष घुंबार्डे, ललित घुंबार्डे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या तालुकाध्यक्षा सौ.मुक्ता आर्दड यांच्यासह पल्लवी गोगुले, योगीता तांबारे, शिला पैठणे, अलका गायकवाड, संगीता घोडके, नीता बेद्रे, भावना जैन, गीता बेद्रे, कालिंदा कातकर, प्रिती दाभाडे, सविता मोटे, संध्या येवले, सिमा जवंजाळ, नीता डरपे, दिपाली लाटे, आरती गायकवाड, त्रिवेणी मुळे, अमृता गायकवाड, भावना लवाडे, शोभा औटी, सिमा होंडे यांच्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंबड पालिका निवडणूक २२ सदस्यसाठी १३२ अर्ज तर एक अध्यक्षसाठी १४ अर्ज दाखल

अंबड । प्रतिनिधी

अंबड सार्वत्रिक निवडणूक करिता नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याची प्रक्रिया आज दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी शांततेत आणि सुरळीतपणे पार पडली. नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याची अंतिम वेळ दुपारी ३:०० वाजेपर्यंत होती.

या मुदतीअखेर एकूण १ नगराध्यक्ष पद आणि ११ वार्डांमधील एकूण २२ सदस्य पदांसाठी प्राप्त झालेल्या अर्जांचा तपशील खालीलप्रमाणे आहे नगराध्यक्ष पद एकूण १ जागेसाठी प्राप्त एकूण नामनिर्देशन पत्रे १४ अर्ज सादर करण्यात आले. सदस्य पद (एकूण २२ जागांसाठी - ११ वार्ड) यासाठी प्राप्त एकूण नामनिर्देशन पत्रे १३२ अर्ज प्राप्त झाली असे एकूण प्राप्त नामनिर्देशन पत्रे नगराध्यक्ष व सदस्य सर्व मिळून १४६ अर्ज प्राप्त झाली. तसेच आज अंबड नगर परिषद प्रभाग क्र ४ मधून सर्वसाधारण महिला मधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा पवार) कडून सौ.कमलबाई भगवानराव मस्के यांना आज शेवटच्या दिवशी नामनिर्देशपत्र दाखल केल्यामुळे प्रभाग क्रमांक चार मध्ये उमेदवारी अर्ज दाखल केल्यामुळे महिलांनी आनंद उत्सव साजरा केला. पुढील निवडणूक प्रक्रियेचे टप्पे या निवडणुकीच्या पुढील टप्प्यांचे वेळापत्रक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे नामनिर्देशन पत्रांची छाननी आज दिनांक: १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११:०० वाजल्यापासून सुरू होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेणे छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांना त्यांचे अर्ज मागे घेण्यासाठी १९ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर सायंकाळी ३:०० वाजेपर्यंत असणार आहे. सर्व उमेदवार, व सर्व नागरिकांनी निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि निःपक्षपातीपणे पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असेआवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तहसिलदार विजय चव्हाण , मुख्याधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मनोज उकिर्डे यांनी केले आहे.

वानगाव येथे निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील वानगाव येथे कै. सरस्वती आत्माराम जोगदंड यांच्या प्रथम वर्ष श्राद्ध निमित्त दिनांक १८ नोव्हेंबर २०२५रोजी समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १०.३०ते ते ०१.०० या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन जोगदंड परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.



बीड तालुक्यातील वानगाव येथील प्रसिद्ध उद्योजक व बंकटस्वामी संस्थांचे विश्वस्त , अखिल भारतीय वारकरी मंडळाचे जिल्हाध्यक्ष श्री ह भ प हरिदास भाऊ जोगदंड यांच्या मातोश्री कै.सरस्वती आत्माराम जोगदंड यांच्या प्रथम वर्षश्राद्ध निमित्त जोगदंड परिवाराच्या वतीने कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. दि १८ रोजी सकाळी १०.३० ते ०१.०० पर्यंत कीर्तन संपन्न होईल.. वानगाव येथील सामान्य शेतकरी कुटुंबात कै. सरस्वती आत्माराम जोगदंड यांनी कठीण परिश्रमातून तीन मुलांना शिकवून अध्यात्मिक संस्कारासह सामाजिक शिकवण दिली. याच संस्कारातून आज तीनही मुलं श्री ह भ प हरिदास भाऊ जोगदंड, विठ्ठल जोगदंड, रतन जोगदंड वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये अस्तित्व निर्माण केला आहे. बीड,संभाजीनगर ,पुणे,मुंबई अशा ठिकाणी बांधकाम व्यवसायामध्ये अग्रेसर आहेत. शून्यातून विश्व निर्माण करण्याची उमेद आणि बळ सरस्वती आई यांनी दिले. तसेच सर्व मुलांना वारकरी संप्रदायाचा विचार आणि संस्कार सोडू नका अशी शिकवण दिली. आईच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त विधायक उपक्रम घेत. तिन्ही मुलांनी वारकरी संप्रदायातील विचाराचा वसा आणि वारसा पुढे चालवत कितर्नाचआयोजन केले आहे. तसेच वारकरी संप्रदायातील विद्यार्थ्यांना आईच्या स्मरणार्थ मदतही करणार आहेत. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांच्या कीर्तन श्रावणाचा सर्व भाविक भक्तांनी आवर्जून लाभ घ्यावा असे आवाहन जोगदंड परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

आ.नारायण कुचे ओबीसी वर भडकले ?

अंबड । प्रतिनिधी

अंबड शहरात नगरपालिका निवडणुकीमध्ये ओबीसीवर अन्या केल्यामुळे एका कार्यकर्त्यांनी आमदार नारायण कुचे यांना मोबाईल वरून विचारणा केली असती त्यांनी सदरील व्यक्तीला आ. कुचे येणे दादागिरीच्या भाषेत फोनवरून सदरील एका व्यक्तीला धमकिले यासंदर्भात सदरील व्हिडिओ व्हायरल झाला यामुळे ओबीसी समाजावर अन्याय झाल्याचे यावरून दिसून येत आहे. यामुळे ओबीसी समाजा कडून निषेध व्यक्त करण्यात येत आहे. तसेच त्याचा परिणाम भाजप नगरसेवकावर होणार आहे असे बोलले जात आहे. तसेच काही दिवसांपूर्वी भाजपचे कट्टर समर्थक संदीप खरात यांना आमदार नारायण कुचे यांनी तिकीट नाकारल्यामुळे त्यांनी दुसऱ्या पक्षात प्रवेश करून राष्ट्रवादी पक्षाकडून तिकीट घेऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यामुळे अंबड शहरातील ओबीसी समाज भाजपवर नाराज असल्याचे दिसून येत आहेत.

विद्यार्थ्यांनी विज्ञान तंत्रज्ञान व नैतिक मूल्यांची सांगड घालत सर्वांगीण प्रगती करावी-पोकळे

आष्टी । प्रतिनिधी

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देशाला प्रगतीच्या शिखरावर नेण्याचे काम केले त्यांना लहान मुलांची विशेष आवड, मनामध्ये अतिशय प्रेमाची व आपुलकीची भावना होती. उच्चशिक्षित व तंत्रज्ञानाची आवड असणारे पंडित नेहरू यांनी तंत्रज्ञानाच्या बाबतीत देशाला जागतिक स्तरावर नेण्याचे काम केले असून विद्यार्थ्यांनीही विज्ञान तंत्रज्ञान व नैतिक मूल्यांची सांगड घालत आपली प्रगती साधावी व देशाच्या विकासात हातभार लावावा असे यावेळी बोलताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेव पोकळे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

आष्टी येथील शाहू महाराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टी संचलित साईज्ञान प्राथमिक व माध्यमिक निवासी इंग्लिश स्कूल, आष्टी येथे पंडित जवाहरलाल नेहरू जयंती तथा बालदिन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भारताचे पहिले पंतप्रधान व 'चाचा नेहरू' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेहरूजींच्या जन्मदिवसानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, संस्कार आणि प्रेरणेचे महत्त्व अधोरेखित करणारे विविध उपक्रम राबविण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेव पोकळे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष ऊर्जाभरित वातावरण लाभले. संस्थेचे सचिव दळवी सर हे देखील उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी नेहरूजींच्या जीवनावर आधारित विचारप्रवर्तक भाषणे, भावस्पर्शी कविता, देशप्रेम जागवणारी गीते आणि रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. मुलांनी सादर केलेल्या छोटेखानी नाटिकेतून 'बालक हे राष्ट्राचे भविष्य' हा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला. विद्यार्थ्यांच्या आणि आत्मविश्वासाचे कौतुक उपस्थितांनी केले. संस्थेचे अध्यक्ष सुखदेव पोकळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात नेहरूजींच्या आधुनिक भारताच्या उभारणीतील योगदानाची माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांनी विज्ञान, तंत्रज्ञान, आणि नैतिक मूल्यांची सांगड घालत सर्वांगीण प्रगती साधावी, असा संदेश दिला. शिक्षणात जिज्ञासा, शिस्त आणि सृजनशीलतेचे महत्त्व उलगडून सांगितले. संस्थेचे सचिव दळवी सर यांनी शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी दिलेल्या योगदानाचा गौरव केला. बालदिनानिमित्त शाळेत आयोजित विविध उपक्रमांमध्ये चित्रकला, निबंधलेखन, वक्तृत्व स्पर्धा यासह ज्ञानवर्धक खेळांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून कार्यक्रमाला रंगत आणली. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि शालेय कर्मचारी यांनी मनापासून मेहनत घेतली. सर्वांच्या सहकार्याने हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, आकर्षक आणि संस्मरणीय पद्धतीने पार पडला. बाल दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण संस्थेचे अध्यक्ष सुखदेव पोकळे यांच्या हस्ते करण्यात आले.

पान १ वरून...

'आत्मा' योजनेसाठी

उपलब्ध होते. या योजनेसाठीचा निधी केंद्र आणि राज्य शासनाच्या ६०:४० या प्रमाणात विभागला गेला आहे. त्यानुसार केंद्राचा हिस्सा २१ कोटी ४७ लाख रुपयांचा तर राज्याचा हिस्सा १४ कोटी ३१ लाख रुपयांचा असे एकत्रित ३५ कोटी ७९ लाख उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या निधीचे वाटप सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी - २७ कोटी ०५ लाख ६६ हजार रुपये. अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी - ४ कोटी ८७ लाख ९६ हजार ९०० रुपये. तर अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी - ३ कोटी ८५ लाख ९९ हजार ९१७ रुपये असणार आहे.

तर स्थानिक स्वराज्य संस्थेची

करण्यासाठी 'ट्रिपल टेस्ट' पाळणे आवश्यक आहे. यापूर्वी २०२१-२२ मध्ये कोर्टाने आरक्षण थांबवले होते, यामुळे निवडणुका रखडल्या. आता राज्य सरकारची भूमिका काय असेल, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

बिबट्यांची होणार नसबंदी

विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यात त्यांनी अधिकाऱ्यांना बिबट्यांच्या हल्यात जीवीत हानी रोखण्यासाठी काय करावे यासाठी कृती आराखडा दिला. बिबट प्रवण क्षेत्रात आता शेळ्या सोडण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. ज्यामुळे मानवी वस्तीवरील हल्ले कमी होतील. बिबट नसबंदीला केंद्राची मान्यता मिळाली असून, शिकारीचा निर्णय विचाराधीन आहे. मात्र जेथे बिबट नियंत्रणातच येत नसेल तेथे त्याला तेथेच गोळ्या घालण्याचे आदेश आहे. या बाबी वनमंत्र्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगीतल्या.

भाजप नगराध्यक्ष पदाचे जिल्ह्यातील

गोपीनाथ गडावर येऊन लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी पंकजाताई मुंडे यांचे सर्व उमेदवारांनी निवडणूकीत संधी दिल्याबद्दल आभार मानले. पंकजा मुंडे यांनी देखील सर्वांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. नगरपरिषद निवडणूकीत सर्व जागांवर संपूर्ण ताकदीनिशी विजयश्री खेचून आणण्याचा निर्धार याप्रसंगी उमेदवारांनी केला. भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, माधव निर्मळ, रूपाली कचरे, विनायक रत्नपारखी, ज्ञानेश्वर मेंडके आदींसह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान

यांना जुलै महिन्यात झालेल्या दडपशाहीत नि:शस्त्र नागरिकांवर गोळीबार करण्याचे आदेश दिल्याबद्दल दोषी ठरवले. कोर्टाने हा निर्णय देताना हसीना यांची एक ऑडिओ क्लिप देखील जाहीर केली, जी बांगलादेशात मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली होती. या ऑडिओमध्ये हसीना पोलीस प्रमुखांना लोकांवर गोळ्या चालवण्यास सांगत असल्याचे स्पष्ट होत आहे. कोर्टाने आपला निर्णय देताना मानवाधिकार आयोगाच्या अहवालाचा देखील उल्लेख केला आहे.

वर्षभरापूर्वी म्हणजेच, नोव्हेंबर २०२४ मध्ये बांगलादेशात मोठा हिंसाचार घडला होता. या हिंसाचारानंतर शेख हसीना पंतप्रधान पदावरून पायउतार झाल्या आणि त्या भारताच्या आश्रयाला आल्या. त्यांच्याविरोधात मानवतेविरुद्धचा खटला दाखल करण्यात आला होता. या खटल्यात त्यांना दोषी ठरवत बांगलादेशमधील न्यायालयाने शेख हसीना यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे. शेख हसीन सध्या भारतात राहत असून, त्यांच्या अनुपस्थितीतच त्यांच्याविरुद्ध हा खटला चालवण्यात आला. ४५३ पानांच्या या निर्णयाचे वाचन करण्यापूर्वी न्यायमूर्ती मोहम्मद गुलाम मुर्तजा मजूमदार यांनी ६ भागांमध्ये सुनावणी केला जाईल, असे सांगितले होते. त्यानुसार, निकालाचे वाचन करत त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

सौदी अरबमध्ये भीषण

वाहनाने पेट घेतला. पाहता पाहता बसचे रूपांतर आगीच्या गोळ्यात झाले. आतमध्ये असणारे बाहेर येण्यासाठी आरडाओरडा करत होते. परिसर किंकाळ्यांनी हादरून गेला होता. लहान मुले, महिलांचा या दुर्घटनेत दुर्दैवी मृत्यू झाला. देवदर्शनासाठी गेले होते, पण काळाने घाला घातला अन् क्षणात होत्याचे नव्हते झाले. आग इतकी भयंकर होती की दुर्दैवी घटनेत ४२ भारतीयांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये २० महिला आणि ११ मुलांचा समावेश आहे. या दुर्घटनेतून फक्त एक प्रवासी वाचला. त्याच्यावर सध्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत. बसला आग लागल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

उद्धव-राज बंधुचे शिवसेनाप्रमुखांच्या

बाळासाहेबांची इच्छा होती व तब्बल १३ वर्षांनंतर स्मृतिस्थळावर एकत्र येऊन ठाकरे बंधूंनी अभिवादन केले. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी पार्क येथे मोठ्या प्रमाणावर शिवसैनिकांनी उपस्थित राहून बाळासाहेबांना अभिवादन केले. सकाळी, ११ च्या सुमारास पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे व आमदार आदित्य ठाकरे हे स्मृतिस्थळावर दाखल आले व त्यांनी शिवसेनाप्रमुखांच्या स्मृतिस्थळावर नतमस्तक झाले. थोड्याच वेळात मनसे अध्यक्ष राज ठाकरे तेथे पोहोचले. त्यांनी अभिवादन केल्यानंतर राज आणि उद्धव यांच्यात पंधरा मिनिटे चर्चा झाली. अर्ध्या तासांच्या उपस्थितीनंतर राज ठाकरे परत जाण्यास निघाले तेव्हा आदित्य ठाकरे हेही त्यांना गाडीपर्यंत सोडण्यास आले होते. यानिमित्त अनेक वर्षांपासून राज आणि उद्धव यांच्यात असलेली कटुता दूर झाल्याचे दिसले. दरम्यान, प्रकृती अस्वास्थामुळे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला आहे. मात्र, तरीही राऊत हे सकाळी शिवाजी पार्क येथे शिवसेनाप्रमुखांच्या स्मृतिस्थळाला अभिवादन करण्यासाठी आले होते. यावेळी ठाकरे गटाचे आमदार, खासदार यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित होते.

लाल किल्ला स्फोट प्रकरणातील

असलेल्या व्यक्तींकडूनच केला जातो. घटनास्थळी कोणतेही पिस्तूल किंवा त्याचे कोणतेही भाग आढळले नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. हा दारूगोळा स्फोटस्थळी कसा पोहोचला आणि संशयितांच्या ताब्यात तो होता का, याचा तपास आता अधिकारी करत आहेत. या नव्या खुलाशामुळे तपासाला एक नवीन दिशा मिळाली आहे. दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ १० नोव्हेंबरला झालेल्या कार स्फोटात गाडी चालवणारी व्यक्ती उमर नबीच होती, हे न्यायवैद्यक पुराव्यांनी निश्चित केले आहे. या भीषण स्फोटात १२ जणांचा मृत्यू झाला, तर अनेकजण जखमी झाले होते. या प्रकरणाशी संबंधित घडामोडींमध्ये नॅशनल मेडिकल कमिशनने जम्मू-काश्मीरमधील चार डॉक्टरांची नोंदणी तत्काळ प्रभावाने रद्द केली आहे. डॉ. मुझफ्फर अहमद, डॉ. आदिल अहमद राथर, डॉ. मुजम्मिल शकील आणि डॉ. शाहीन सईद यांचा त्यात समावेश आहे. डॉ. आदिल अहमद राथर, डॉ. मुजम्मिल शकील आणि डॉ. शाहीन सईद यांना यापूर्वीच दहशतवादी प्रकरणांशी संबंधित असल्याच्या आरोपाखाली दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. तसेच तपास यंत्रणांनी खुलासा केला आहे की, जवळपास आठ संशयित आरोपी चार वेगवेगळ्या ठिकाणी एकाच वेळी स्फोट घडवण्याच्या तयारीत होते. प्रत्येकाकडे अनेक सुधारित स्फोटक उपकरणे होती.

राज्यात आणखी एक ५००

ही बातमी सोशल मीडीयावर शेअर करत अंजली दमानिया यांनी अजित पवारांवर टीका केली आहे. आता आणखी एक ५०० कोटींचे हॉस्पिटल अजित पवारांच्या नातेवाईकांना? अशी पोस्ट त्यांनी केली आहे. शताब्दी रुग्णालय हे पीपीपी तत्वानुसार चालवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने निविदा मागवल्या होत्या. त्यासाठी तीन निविदा आल्या होत्या. त्यापैकी एक निविदा ही तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टची होती. ही ट्रस्ट पद्मसिंह पाटील यांची असून, ते अजित पवारांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार यांचे सावत्र बंधू आहेत. तर, पद्मसिंह पाटलांचे पुत्र तथा अजित पवारांचे पुतणे राणा जगजीतसिंह पाटील हे या ट्रस्टचा कारभार पाहतात. राणा पाटील हे भारतीय जनता पार्टीचे नेते असून ते तुळजापूरचे आमदारही आहेत. यावरून अंजली दमानिया यांनी म्हटले आहे की राज्यातील आणखी एक रुग्णालय अजित पवारांच्या नातेवाईकांना दिले जाणार आहे.

महाराष्ट्र यांच्या घशात घाला, मुख्यमंत्र्यांवरही टीका

अंजली दमानिया यांनी या प्रकरणावर मुख्यमंत्री फडणवीसांवर टीका करत, आता आणखी एक ५०० कोटी रुपयांचे हॉस्पिटल अजित पवारांच्या नातेवाईकांना. विरोध असताना देखील हे रुग्णालय पीपीपी तत्वाने देण्याचा घाट घातला आणि योगायोगाने यात पद्मसिंह पाटील यांच्या तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टने बोली लावली आहे. याच रुग्णालयाच्या जवळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ एक रुग्णालय बांधत आहे आणि हे तयार रुग्णालय अजित पवारांच्या नातेवाईकांना बहाल केले जात आहे. मुख्यमंत्री फडणवीसची, तुम्ही एक काम करा, एकदाचा अख्खा महाराष्ट्र या सगळ्या राजकारण्यांच्या घशात घालून मोकळे व्हा, अशी टीका दमानिया यांनी केली आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

थोडक्यात

बीड : वंचित बहुजन आघाडीच्या वतीने बीड नगरपरिषदेसाठी सारिकाताई विकास जोगदंड यांचा उमेदवारी अर्ज दाखल करत त्यांना शुभेच्छा देताना जिल्हाध्यक्ष उध्दव खाडे, युवक जिल्हाध्यक्ष मेजर अनुरथ वीर, तालुकाध्यक्ष किरण वाघमारे

रूढी परंपरांना फाटा वडिलांच्या गंगापूजनानिमित्त अनाथांना अन्नदान

दिंद्रुड । प्रतिनिधी

दिंद्रुड येथून जवळच असलेल्या संगम येथील सहशिक्षक दिपक रायकर यांच्या वडीलांचे गेल्या काही दिवसांपूर्वी निधन झाले. रविवारी त्यांच्या गंगापूजनाचा कार्यक्रम होता. या निमित्ताने रूढी परंपरांना फाटा देत बीडच्या इन्फंट इंडिया च्या अनाथ बालकांना अन्नदानाचा आदर्श उपक्रम रायकर यांनी आयोजित करत आदर्श पायंडा निर्माण केला आहे.

दिपक यांचे वडील पांडुरंग रायकर यांचे ३ नोव्हेंबर रोजी वार्धक्यात निधन झाले. यानिमित्ताने गंगापुजनात किर्तन,भजन, भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यापेक्षा काहीतरी सामाजिक उपक्रम राबवावा या हेतूने बीडच्या इन्फंट इंडिया च्या अनाथ बालकांना जवळपास एक महिना पुरेल असे अन्नदानाचे साहित्य दिपक रायकर यांनी भेट देत आदर्श निर्माण केला आहे. दिपक यांचे वडील पांडुरंग रायकर हे जीवनभर सामाजिक उपक्रम राबवण्यात सक्रिय व्यक्तिमत्व होते. त्यांचे स्मरण कायम राहण्यासाठी सामाजिक दायित्व निभावण्याच्या हेतूने हा उपक्रम राबवल्याचे दिपक रायकर सांगतात. रूढी व पारंपारिक बाबींना फाटा देत राबवलेल्या या उपक्रमाचे सर्वांकडून आता स्वागत होत आहे.

पांडुरंग रायकर हे सामाजिक कार्यासाठी प्रेरणादायक होते, त्यांच्या निधनानंतर त्यांचे स्मरण कायम राहावे या हेतूने रायकर परिवाराने हा उपक्रम राबवला. सहशिक्षक दिपक रायकर व परिवाराने राबवलेल्या उपक्रमाचे कौतुक आहे.

–विलास पारेकर, सामाजिक कार्यकर्ते

माझ्या आश्रमातील वंचित,पिडीत,अनाथ बालकांच्या मुखात घास भरवत रायकर कुटूंबाने पांडुरंग रायकर यांच्या सामाजिक स्मृतींचा जागर केला आहे.समाजाला परिवर्तनाचा संदेश देणारा हा उपक्रम मानवता धर्म निभावणारा असल्याने त्यांचे सतपात्री दान माझ्या अनाथालयात आनंद निर्माण करणारे आहे.

दत्ता बारगजे,आनंदग्राम,पाली, बीड.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी राज्य सरकार तयार-आ. सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील ६ कोटी ७४ लक्ष रुपायाचे चार रस्ते कामांचा सोमवार (दि.१७) रोजी आ. सुरेश धस यांच्याहस्ते शुभारंभ करण्यात आला यावेळी ते अंभोरा येथील कार्यक्रमात बोलत होते. यावेळी माजी आ. साहेबराव दरेकर, सुखदेव खकाळ, सरपंच सागर आमले, माजी सभापती अंकुश चव्हाण, भाजपा तालुकाध्यक्ष रमेश गावडे, अनिल ढोबळे, अशोक इथापे, सजंय ढोबळे यांच्यासह आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. पुढे बोलतांना आ.धस म्हणाले, रस्ता हा दर्जेदार झाला पाहिजे अशी सर्वांनीच मागणी केली आहे. आणि त्या पध्दतीनेच हा रस्ता दर्जेदार होणार असल्याची ग्वाही आ.धस यांनी दिली. वाघळुज ते अंभोरा ह्या रस्त्याचे काम पावसामुळे दिरंगाई झाले आहे. आता लवकरच ते काम मार्गी लागणार आहे. तसेच या ठिकाणी असलेल्या पोलिस ठाणे व पोलिस वसाहत

करण्यात येणार असून त्याचा प्रस्ताव मंत्रालयात मंजुरी साठी असून लवकरच हे काम मार्गी लागणार असल्याचे आमदार धस यांनी सांगितले. माजी आ. साहेबराव दरेकर म्हणाले, गुत्तेदारांनी हे काम कसे चांगले करील यासाठी गावकऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. यामध्ये गट-तट बाजुला ठेऊन विकास कामांसाठी एकत्रित येण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. सरपंच सागर आमले म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले रस्त्याचे काम आमदार धस यानी मार्गी लावले पण आता संबंधित गुत्तेदारांनी हे काम चांगले दर्जाचे करावे अशी मागणी सरपंच आमले यांनी केली. कार्यक्रमाची प्रस्तावना शाखा अभियंता सुनील राठोड यांनी केले.

तालुक्यातील पहिली वेबसाईट असलेली ग्रामपंचायत अंभोरा सर्व कारभार ऑनलाईन पध्दतीने सुरू असून यामध्ये अंभोरा ग्रामपंचायतीचा कारभार जगात पहाता यावा यासाठी सरपंच सागर आमले यांच्या पुढाकाराने वेबसाईट सुरू करण्यात आली. त्या वेबसाईटचा शुभारंभ आमदार सुरेश धस यांच्याहस्ते करण्यात आला.

बिहारमध्ये चांगल्या कामामुळे यश

बिहारमध्ये विरोधकांच्या सभेला असलेली गर्दी मतांमध्ये बदलली नाही. पण तर त्यांनी भाषणामध्ये वेगवेगळे शब्द वापरल्यामुळे लोकांनी त्यांना त्यांची जागा दाखवली आहे. बिहारमध्ये चांगल्या कामामुळे अत्यंत महत्त्वाचा असा निधी मंजूर करून घेतला आहे. मंजूर झालेली रस्ते विकास कामामध्ये १. राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते नांदूर ७० लाख रुपये निधी २. राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते अंभोरा-हिवरा ५४ लाख रुपये निधी १ कोटी३. प्रमुख जिल्हा मार्ग १ ते पारोडी-बोरोडी ३ कोटी ५० लाख रुपये निधी, ४. लोणी ते खुंटेफळ-वाटेफळ १ कोटी रुपये निधी, या चार ही रस्ते कामांचा भव्य शुभारंभ अंभोरा येथे सकाळी १०.०० वा., नांदूर येथे सकाळी ११.०० वा. आणि पारोडी फाटा येथे १२.०० वा. या चार ही रस्ता कामांचा शुभारंभ आमदार सुरेश धस यांचे हस्ते करण्यात येणार असून ग्रामीण भागातील संपर्क वाढवणाऱ्या या रस्त्यामुळे शालेय विद्यार्थी, शेतकरी, तसेच दैनंदिन कामकाज करणाऱ्या नागरिकांना मोठी सोय असल्याने समाधान व्यक्त केले असून या ५. शुभारंभकार्यक्रमाप्रसंगी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने आवाहन करण्यात आले आहे. वेगवेगळे शब्द वापरल्यामुळे लोकांनी त्यांना त्यांची जागा दाखवली आहे. बिहारमध्ये चांगल्या कामामुळे यश मिळाले असल्याचे आ. धस यांनी सांगितले. या रस्ते कामांचा झाला आज शुभारंभ १. राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते नांदूर ७० लाख रुपये निधी,२. राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते अंभोरा-हिवरा ५४ लाख रुपये निधी, १ कोटी ३. प्रमुख जिल्हा मार्ग १ ते पारोडी-बोरोडी ३ कोटी ५० लाख रुपये निधी, ४. लोणी ते खुंटेफळ-वाटेफळ १ कोटी रुपये निधी, या चार ही रस्ते कामांचा भव्य शुभारंभ आमदार धस यांच्याहस्ते करण्यात आला.

खंडोबाच्या दैवी तेजात उजळणार चंपाषष्ठी

बीड खंडोबा दिपमाळ मंदिराची ऐतिहासिक यात्रा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे आराध्य दैवत असलेल्या श्री खंडोबा दिपमाळ मंदिरात चंपाषष्ठी निमित्त २५ ते २६ नोव्हेंबर २०२५ या दोन दिवसीय भव्य यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रद्धाळूंच्या असंख्य आस्थास्थान असलेले हे देवस्थान आपल्या १७ व्या शतकातील हेमाडपंथी दगडी बांधकाम, उंच दीपमाळ, तसेच प्राचीन परंपरांसाठी विशेष ओळखले जाते.

मंदिर परिसरातील दोन सुमारे ७० फूट उंच दीपस्तंभ हे या ठिकाणचे प्रमुख वैशिष्ट्य असून, यात्रेच्या काळात त्यावरील दीपप्रज्वलन हा भक्तांसाठी आध्यात्मिक आनंदाचा सोहळा ठरतो. गाभाऱ्यातील मार्तंड-भैरव

स्वरूपातील खंडोबा हे शौर्य, संरक्षण व धर्मसंस्थापनेचे प्रतीक मानले जाते. चंपाषष्ठी हा दिवस मल्लमणी राक्षसांचा संहार करून धर्मरक्षण केल्याच्या ऐतिहासिक पौराणिक स्मृतीशी जोडलेला आहे. त्यामुळे या दिवशी अभिषेक, दिपदान, काठीपूजन, पालखी सोहळा, जागरण-गोंधळ आणि रथप्रदक्षिणा अशा पारंपरिक धार्मिक कार्यक्रमांना विशेष महत्त्व असते.

या यात्रेनिमित्त मंदिर संस्थानतर्फे विशेष महापूजा व अभिषेक, भजन-कीर्तन व जागरण-गोंधळ, भव्य पालखी व रथप्रदक्षिणा, तसेच महाप्रसाद, रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी, स्वच्छता उपक्रम यांचे आयोजन करण्यात आले आहे.

या दिव्य उत्सवात मोठ्या संख्येने उपस्थित राहून ''यल्ला मल्लारी, जय खंडोबा'' जयघोषात दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री खंडोबा देवस्थान संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

''श्री खंडोबा दीपमाळ मंदिर संस्थानतर्फे भक्तांच्या सोयीसाठी आणि या पवित्र ऐतिहासिक मंदिराच्या जतनासाठी अनेक विकासकामे सुरू केली आहेत. संपूर्ण विकास आराखडा तयार असून अल्प पूर्तता बाकी आहे; ती पूर्ण झाली तर मंदिराचा विकास वेगाने पुढे जाईल. मात्र पुरातत्व विभागाच्या अडमुठ्या भूमिकेमुळे आणि स्थानिक प्रशासनाच्या उदासीनतेमुळे शतकानुशतकांच्या परंपरेचे हे देवस्थान अनावश्यक अडथळ्यांना सामोरे जात आहे. देवस्थानाचा विकास हा कोणाच्याही अहंकाराचा बळी ठरू नयेयासाठी आम्ही अपेक्षित सहकार्याची तीव्र मागणी करतो.''

रामनाथ खोड, कोषाध्यक्ष, श्री खंडोबा दीपमाळ मंदिर संस्थान, बीड

पान ६ वरुन...

अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ

व त्यानंतर आरोपीने माझे सु करायचे जागेत त्याची लघवी करायची जागा घातली त्यावेळी माझा भाउ मला बोलवायला आला व त्याने दारातून आवाज दिल्याने मला आरोपी यांनी सोडले व मी घरी गेले.पिडीतेच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन शिरूर कासार येथे आरोपी विरूध्द कलम ३७६अ, ब ३७६ड, भादवी आणि कलम ५ (ग), ६,११(१), १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध्द कायदा सन २०१२ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरून तात्कालील उपनिरिक्षक डी. बी. कोळेकर, पिंक पथक आष्टी यांनी या प्रकरणाचा तपास केला व जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे आरोपी विरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.सदर प्रकरणी सुनावणी तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश -१ मा.एस.एस. घोरपडे साहेब बीड यांच्या न्यायालयात झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकुण ०८ साक्षीदार तपासण्यात आले व सदर प्रकरणत पिडीता, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी यांचा पुरावा व सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांचा युक्तीवाद ग्राहय धरून तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश १ मा.एस.एस. घोरपडे साहेब यांनी आरोपी यास कलम ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये दोषी ठरवून २० वर्ष सश्रम करावास व १०,०००/ रुपये दंड व दंड न भरल्यास १ वर्ष सश्रम कारावास एवढया दंडाची शिक्षा ठोठावली आहे. व सदर प्रकरणातील उर्वरीत दोन आरोपी विधीसंघर्षग्रस्त बालक असल्यामुळे त्यांचेविरूध्द बाल न्यायमंडळ बीड येथे वेगळे दोषारोपपत्र दाखल केलेले आहे.सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले त्यांना ॲड. पी.बी. जगताप यांनी सहकार्य केले, तसेच जिल्हा सरकारी वकील श्री. अजय दि. राख यांनी मार्गदर्शन केले तपास अधिकारी पोनि. श्री डी.बी. कोळेकर व पैरवी अधिकारी पोलीस कॉन्स्टेबल सुरेश कदम यांनी सहकार्य केले.

भव्य शक्तिप्रदर्शन करत

रॅलीची सुरुवात ही गुरुवार पेठ येथील जोधाप्रसादजी मोदी विद्यालयापासून निघून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे, सदर बाजार, मोची गल्ली, गांधी नगर , मंडी बाजार , पाटील चौक , मंगळवार पेठ , वीर सावरकर चौक बस स्थानक मार्गे नगर परिषद कार्यालयापर्यंत येऊन सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याने संपन्न झाली. भव्य अशा या महारॅलीच्या माध्यमातून राजकिशोर मोदी यांच्यावरील मतदारांचे प्रेम व जिव्हाळा तसेच यातून आगामी निकालाची झलक देखील दिसून आली. यामुळे विरोधी गटाच्या पायाखालची वाळू सरकू लागल्याचे स्पष्ट संकेत पहावयास मिळत आहेत.लोकविकास महाआघाडीच्या माध्यमातून अंबाजोगाई शहरात नवनवीन विकासाच्या संकल्पना राबविण्यात येणार असल्याचा संकल्प राजकिशोर मोदी व त्यांच्या सर्व सहकारी उमेदवारांनी केला आहे. कोणतीही तयारी किंवा नियोजन नसतांना सुद्धा मतदार इतक्या उत्स्फूर्तपणे सहभागी झाला होता यामध्ये एकही व्यक्ती ग्रामीण भागातील नव्हता हे विशेष म्हणावे लागेल.

माजलगाव न.प.अध्यक्षपदासाठी

बाबुराव काळ,ब. सर्वसाधारण महिला शेख अफरीन ईलियास पटेल,प्रभाग क्रंमाक १० अ. सर्वसाधारण महिला अनुराधा दत्ता महाजन,ब. सर्वसाधारण अभय राजेभाउ होके पाटील प्रभाग क्रंमाक ११-अ. ना मा.प्र. महिला कौशल्या गोपाळराव दळवे,ब. सर्वसाधारण अजीम पठाण समंदर,प्रभाग क्रंमाक १२ अ. अनुसूचित जाती निकीता बाबासाहेब जाधव,ब. सर्वसाधारण शेख अनिस शेख पाशा, प्रभाग क्रंमाक १३,अ. अनुसूचित जाती संतोष विश्वनाथ जाधव,ब. सर्वसाधारण महिला आशाताई राम गायकवाड.

दलित मित्राच्या लेकीला

प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, पक्षाचे निरीक्षक माजी आमदार संजय दौंड, युवकचे जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, सावता परिषदेचे कल्याण आखाडे, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक आघाडीचे शेख निजाम, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, शिवसंग्रामचे जिल्हा कार्यवाह सुहास पाटील, तालुकाध्यक्ष राजेंद्र राऊत, माजी नगरसेवक फारुक पटेल, विनोद मुळूक, विलास विधाते, शेख मुजीब, माध्यम प्रमुख भागवत तावरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार, नगरसेवक पदाचे ५२ उमेदवार व राष्ट्रवादी, शिवसेना व शिवसंग्राम पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धानोरा महाविद्यालयाचे प्रा.निसार शेख यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील साबलखेड येथील सर्व सामान्य कुटुंबात जन्मलेल्या प्रा निसार शेख यांना शनिवारी दैनिक लोकशक्तीच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त 'लोकशक्ती महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित आले. सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, नागपूर येथील अप्पर पोलीस अधीक्षक डॉ दत्ताराव राठोड, 'गावरान मस्ती' फेम वैभव कुऱ्हाडे (गंठणकुमार), ज्येष्ठ साहित्यिक ऐश्वर्य पाटेकर, डॉ. कैलास दौंड, झुंजार नेताचे उपसंपादक उत्तमराव बोडखे, संपादक विजय लेंडाळ, सहसंपादक इम्रान शेख, पत्रकार जावेद सय्यद व इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

प्रा निसार शेख हे शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा येथे गेली २५ वर्षापासून प्राध्यापक म्हणून न्यायदानाचे पवित्र कार्य करीत आहेत. शिक्षण क्षेत्रा बरोबरच ते पत्रकार म्हणून ही उत्कृष्ठ कार्य करीत आहेत. शैक्षणीक व पत्रकारिता या दोन्ही क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावत असल्याने त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. प्रा निसार शेख यांनी गेली २५ वर्षात हजारो विद्यार्थी घडविले आहे. आज त्यांचे अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी विविध क्षेत्रात उच्च पदस्थ अधिकारी पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना शनिवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी अहील्यानगर येथील हॉटेल यशग्रँड येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात लोकशक्ती महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक राज्यस्तरीय पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा निसार शेख यांचे माजी आमदार भिमरावजी धोंडे, प्रशासन अधिकारी शिवदास विधाते, डी बी राऊत, माऊली बोडखे, संदीप नन्नवरे, सागर वाघुले, प्राचार्य भगवान वाघुले, उपप्राचार्य गहिनीनाथ एकशिंगे, पत्रकार अविनाश कदम, अक्षय विधाते, मुख्याध्यापक तथा पत्रकार जावेद शेख, सामाजिक कार्यकर्ते समीर शेख, संतोष नागरगोजे, गनिभाई तांबोळी, निसारभाई कुरेशी यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

जिल्ह्यात लंपी आजाराने जनावराचा मृत्यू

शासनाने तात्काळ नुकसान भरपाई द्यावी -प्रा.बबनराव आंधळे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात विविध तालुक्यांमध्ये साधारणता ८०० ते ९०० जनावरांना लंपी त्वचारोग बाधा झालेली आहे यात ५० ते ६० जनावरांचा मृत्यू देखील झाला असून जे शेतकरी पशुपालक आहेत ते चिंतेत आहेत या गंभीर परिस्थितीमध्ये यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने करून शासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केली आहे सद्यस्थितीत बीड जिल्ह्यात लंपी त्वचारोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला आहे जिल्ह्यात शेकडो जनावरांना बाधा झाली आहे आतापर्यंत ८०० ते ९०० जनावरे बाधित झाले असून पन्नास-साठ जनावरांचा मृत्यू झालेला आहे दरम्यान ५०० ते ६०० जनावर उपचार नंतर बरी झालेली आहेत दरम्यान ३,४१,१३५ जनावरांचे लसीकरण पूर्ण करण्यात आले असून या आजारामुळे शेतकरी वर्गावर मोठा आर्थिक परिणाम झाला असून दूध उत्पादनात घट झाली आहे अनेक ठिकाणी दुधाचे सेवन टाळण्याच्या सूचना देण्यात आल्याने दुध व्यवसायिकानाही फटका बसत आहे या पार्श्वभूमीवर लंपी आजाराने बाधित भागात पशुवैद्यकीय पथके वाढवून उपचार तातडीने सुरू ठेवावेत लसीकरण मोहिमेला गती देऊन शंभर टक्के जनावराचे लसीकरण पूर्ण करावे लंपी बाधित व मृत जनावरांच्या मालकांना म्हणजे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मंजूर करावी जिल्ह्यातील पशुधन बाजार दुग्ध संघ व डेरी केंद्रासाठी तात्पुरती मार्गदर्शक तत्वे लागू करावीत तसेच जिल्हा प्रशासनास आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा आपल्या हस्तक्षेपामुळे या परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यात निश्चित मदत होईल असा विश्वासही प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी व्यक्त केला आहे बीड जिल्ह्यात मागील काही दिवसापासून लंपी या आजाराचा प्रादुर्भाव वाढत आहे यामुळे जनावराचे मृत्यू देखील झालेले आहेत शिवाय पशुपालकाचा मोठा खर्चही होत आहे अशावेळी बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांनी या विषयाकडे लक्ष देणे आवश्यक आहे परंतु तसे होताना दिसत नाही अशावेळी केवळ प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी या विषयात लक्ष घालून बीड जिल्ह्यातआपले चौफेर लक्ष असल्याचे दाखवून दिले आहे.



कल्याणस्वामी संस्थांनचा कलशारोहन सोहळा व हरिनाम सप्ताह

नामांकित कीर्तनकार हजेरी लावणार; भाविकांनी लाभ घेण्याचे कीर्तनकार सोनाली दीदी यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील श्रीक्षेत्र कल्याणस्वामी संस्थानच्या मंदिराचा भव्य कलशारोहण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह, ११ कोटी नामजप, त्रिकाल हरिपाठ कार्यक्रमाचे दिनांक १८ नोव्हेंबर पासून आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध, नामांकित कीर्तनकाराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती, श्रीक्षेत्र कल्याणस्वामी संस्थानच्या अध्यक्षा रामायणाचार्य ह.भ.प. साध्वी सोनाली दिदि यांनी दिली. यावेळी संस्थांचे उपाध्यक्ष तथा महंत ईश्वर स्वरूप चैतन्य महाराज यांची उपस्थित होती.

याप्रसंगी बोलताना साध्वी सोनाली दीदी म्हणाल्या, श्रीक्षेत्र कल्याण स्वामी संस्थान हे गेल्या पाचशे वर्षां पूर्वीचे जुने संस्थान आहे. या ठिकाणी वंशपरंपरागत नववी पिढी आज अध्यात्मिक, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करत आहे. संस्थांनचा जीर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात आले असून अद्यावत दगडी मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. कल्याण स्वामी संस्थान मंदिराचा कलशारोहन व अखंड हरिनाम सप्ताह निमित्त सांप्रदायातील मान्यवर, नामांकित दिग्गज संस्थानला भेटी देणार आहेत. कलशारोहन कार्यक्रमासाठी नवसारी, सुरत येथील स्वामी श्रीहरी जीवनदास शास्त्री संस्थापक श्रीनारायण मुनी दिव्यधाम, महंत गुरुवर्य महंत शिवाजी महाराज, नारायणगड, न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री, भगवानगड, महामंडलेश्वर महादेवानंद भारती अश्वलिंग संस्थान, महंत विठ्ठल महाराज शास्त्री, गहीनाथ गडकर, शांतीब्रह्म ह.भ.प. नवनाथ बाबा, गोरक्षनाथ टेकडी, महंत स्वामी जनार्दन महाराज मच्छिंद्रगड, महामंडलेश्वर १००८ त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज, इंदूवासिनी संस्थान, महंत राधाताई सानप महाराज, आईसाहेब संस्थान, महासांगवी आदी साधू, संत उपस्थित राहणार आहेत. सप्ताहात मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर पासून सुरू होणाऱ्या सप्ताहात पहिल्या दिवशी समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदुरीकर यांचे कीर्तन, बुधवार दिनांक १९ नोव्हेंबर रोजी हभप आदिनाथ महाराज शास्त्री तारकेश्वरगड, गुरुवार दिनांक २० नोव्हेंबर नोव्हेंबर रोजी गोरक्षक रामायणाचार्य ह.भ.प. गुरुवर्य संजय महाराज पाचपोर, शुक्रवार दिनांक २१ नोव्हेंबर रोजी गुरुवर्य ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, पंढरपूर, शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी हभप अच्युत महाराज दस्तापुरकर, रविवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी धर्मगुरू अमृता आश्रम स्वामी महाराज, बीड यांचे कीर्तन, सोमवार दिनांक २४ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. साधी सोनाली दीदी, अध्यक्ष श्रीक्षेत्र कल्याण स्वामी संस्थान, चकलांबा यांचे कीर्तन होणार आहे. मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर रोजी कीर्तनकेसरी ह.भ.प. अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. या सप्ताहातील प्रत्येक कीर्तनास महाराष्ट्रातील ख्यातनाम, सुप्रसिद्ध गायक, वादक उपस्थित राहणार आहेत. परिसरातील महंत, गायक, वादक यांचीही या कार्यक्रमास उपस्थिती राहणार आहे.

जय जवान माध्यमिक विद्यालयात भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी

वडवणी । प्रतिनिधी

अरुणा असफअलि महिला मंडळ,बीड संचलित.. सुरू असलेल्या जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव बु तालुका वडवणी जिल्हा बीड येथील विद्यालयात १५ नोव्हेंबर २०२५ रोजी महान जननायक,थोर क्रांतिकारक, धरती आबा, भगवान,बिरसा मुंडा यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.सदरील जयंतीच्या कार्यक्रमासाठी विद्यालयातील सांस्कृतिक विभाग द्वारे तयारी करण्यात आली सदरील कार्यक्रम सुरुवात ही महान थोर क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा यांच्या पवित्र प्रतिमेस पुष्प, हार अर्पण करून त्यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच जयंती निमित्त शाळेत विविध उपक्रम राबविण्यात

येऊन क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या त्या मध्ये अनेक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला या वेळी विद्यालयाचे प्राचार्य श्री. सारोक्ते डी जी सर यांनी आपल्या भाषणातून उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवन कार्याबद्दल आदिवासी समाजक्रांतीचे जनक व एक स्वातंत्र्यसेनानी. त्यांचा जन्म झारखंडमधील उलिहातु या छोट्याशा खेड्यात सन १५ नोव्हेंबर १८७५ मध्ये झाला. त्यांचे वडील सुगना व आई करमी या दांपत्यापोटी झाला. जन्म गुरुवारी म्हणजे बिस्युतवार किंवा बृहस्पतिवार या दिवशी झाला, म्हणून त्यांचे नाव 'बिरसाख्र ठेवण्यात आले. बिरसा यांच्या कुटुंबाची परिस्थिती हलाखीची होती. त्यामुळे बिरसांच्या जन्मानंतर सर्व कुटुंब उदरनिर्वाहासाठी बिरसांची आत्या दासकीर हिच्या आयुभातु या गावी गेले. बासरी व टुईला वाजविणे, नृत्य, नकला, चित्र रेखाटणे, आखाड्यात जाणे इत्यादी छंदही त्यांच्या अंगी होते.

बिरसांना शिक्षणाची आवड होती. सुरुवातीला ते आयुभातुजवळ सलगा गावी जयपाल नाग या आदिवासी व्यक्तीने चालविलेल्या आश्रमात जात. पुढे बिरसांचे मोठे भाऊ कानु यांनी त्यांना जर्मन ईसाई मिशन स्कूलमध्ये दाखल केले (१८८६). तत्पूर्वी शाळेच्या अटीनुसार त्यांना ख्रिश्चन धर्म स्वीकारावा लागला. शाळेमध्ये जर्मन लुथेरियन मिशनचे अध्यक्ष फादर नोट्रोट यांनी भाषणामध्ये मुंडा आदिवासींबद्दल ठग, चोर, बेइमान इत्यादी शब्दांचा वापर केला. तेव्हा बिरसा यांनी फादर नोट्रोट यांना खडसावून प्रत्युत्तर दिले. रांची येथे कैदेत असताना इंग्रजांनी त्यांचा अतोनात छळ केला. तेथेच त्यांचे निधन झाले.

थंडीची लाट येणार! पुढील सहा दिवस कसं असेल हवामान?

राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. सध्या राज्याच्या बहुतांश भागात थंडीचा जोर वाढल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या थंडीमुळं ठिकठिकाणी शेकोट्या पेटल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. उद्या काही भागात थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, सध्या थंडीची लाट कुठे कुठे आहे. तसेच पुढील सहा दिवस राज्यातील वातावरण कसं राहणार याबाबतची सविस्तर माहिती ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे. सध्या महाराष्ट्रात जाणवत असलेली थंडी, आजपासुन पुढील सहा दिवस म्हणजे शुक्रवार २१ नोव्हेंबर (मार्गशीर्ष प्रतिपदा) पर्यंत अशीच जाणवणार असुन पुढील ३ दिवस परवा मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर पर्यन्त थंडीत काहीशी वाढ होण्याची शक्यता जाणवते. शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर पासुन सध्यापेक्षा थंडी केवळ काहीशी कमी होण्याची शक्यता जाणवते.

करमाळा तालुक्यातील जेऊरलाला आज पहाटे पाच वाजता ९ अंश से. इतके किमान तापमान नोंदवले आहे. सरासरीपेक्षा ५.५ इतक्या अंश से. ने ते खालावून तेथे व लगतच्या परिसरात

थंडीची लाट जाणवत आहे.

महाराष्ट्रातील डहाणू जळगांव नंदुरबार नाशिक मालेगाव अहिल्यानगर पुणे सांगली सातारा छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, बीड, नांदेड, परभणी ह्या शहरात व संपूर्ण विदर्भातील शहरात व लगतच्या परिसरात पहाटेच्या ५ च्या किमान तापमानाचा पारा सरासरीच्या ४ ते ५ डिग्रीने खालावून तेथे आजही चांगलीच थंडी जाणवली असुन थंडीचे सातत्य टिकून आहे.

दिवसाही जाणवतोय गारवा : मालेगांव(जि. नाशिक) जळगांव बीड नांदेड वाशिम येथे दुपारी ३ चे कमाल तापमान सरासरीपेक्षा ३ डिग्रीच्या आसपास खालवले असल्यामुळे तेथे व लगतच्या परिसरात रात्री बरोबर दिवसाही काहीसा गारवा जाणवत आहे.शेती पिकांना थंडीचा फायदा गेल्या ८ ते १० दिवसापासून म्हणजे ८ नोव्हेंबर पासून जाणवत असलेल्या माफक थंडीमुळे महाराष्ट्रातील सध्याचे बाल्यावस्थेतील रब्बीची शेतपिके, फळ-बागा व इतर भाजीपाला पिकांना मदतच होवु शकते. त्यामुळं सुरुवातीच्या प्राथमिक अवस्थेतील ह्या वर्षीच्या रब्बी हंगामातील पिकांसाठी ही जमेचीच बाजू समजावी, असे वाटते.

उद्या काही भागात थंडीच्या लाटेचा इशारा दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, राज्यात उद्या काही भागात थंडीच्या लाटेचा इशारा उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाडा गारठणार असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. दोन्ही भागांत किमान सरासरीपेक्षा कमी तापमान राहण्याचा अंदाज आहे. उत्तर महाराष्ट्रात धुळे, नंदुरबार, जळगाव, आणि नाशिकातील काही भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली आणि नांदेडात देखील तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज आहे.

रांगडा कांद्याची लागवड करताना ही माहिती घ्या

महाराष्ट्रात अनेक भागात रांगडा कांद्याची लागवड होते कारण या हंगामात लागवड केलेल्या कांद्याची साठवणक्षमता खरिप हंगामापेक्षा उत्कृष्ट असते. रांगड्या कांद्याच्या लागवडीसाठी ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये रोपवाटिका तयार केली जाते आणि ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात रोपांची पुनर्लागवड केली जाते. जाणून घेऊ या रांगडा कांद्याचे सध्या करावयाचे व्यवस्थापन.

रांगडा कांद्याचे व्यवस्थापन : एक एकर कांदा लागवडीसाठी दोन गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका तयार करावी. एक एकर लागवडीसाठी दोन ते तीन किलो बियाणे पुरेसे आहे. पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करण्यासाठी प्रति किलो बियाण्यास २ ग्रॅम कार्बेन्डाझिम हे बुरशीनाशक चोळावे. पेरणीपूर्वी २०० किलो शेणखतासोबत ५०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हिरीडी वापरून जमिनीत मिसळावे. रोपवाटिकेत ठिबक किंवा स्प्रिंकलर सिंचन पद्धतीचा वापर करण्यासाठी जमिनीपासून १० ते १५ सें.मी. उंच, १ ते १.२ मीटर रूंद आणि गरजेनुसार लांब गादीवाफे जमिनीच्या उताराला आडवे तयार करावेत. यामुळे

रोपांची वाढ एकसारखी होते आणि पाणी फार काळ साचून राहत नाही, रोपे कुजत किंवा सडत नाहीत, लावणीच्या वेळी सहज उपटून काढता येतात, रोपांच्या गाठी जाड व लवकर तयार होतात. वाफे तयार करताना दर १६०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम स्फुरद, ४०० ग्रॅम पोटॅश प्रति २०० चौरस मीटर याप्रमाणे खते द्यावीत.

रुंदीशी समांतर ५-७.५ सें.मी. अंतरावर एक रेघा पाडून १-१.५ से.मी. खोलीवर बियाणे पेरावे. पेरणीनंतर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खताने बियाणे झाकून ठेवावे, नंतर झारीने जेमतेम वाफ्यावर फिरेल अशा पद्धतीने पाणी द्यावे. पेरणीनंतर २० दिवसांनी हाताने खुरपणी करून ८०० ग्रॅम प्रति २०० चौरस मीटर या प्रमाणात नत्र द्यावे.

शेतकऱ्यांनो, बहुउद्देशीय पीक पद्धती घ्या अन् मिळवा बक्कळ नफा

मागील काही वर्षांपासून देशात पावसाचे प्रमाण चांगले आहे. त्यामुळे जुन्या पीक पद्धतीला फाटा देत शेतकरी नव्या पद्धतीचा अवलंब करून आधीक उत्पादन घेताना दिसत आहेत. मल्टी लेयर फार्मिंग म्हणजेच बहुउद्देशीय पीक पद्धती , या पद्धतीचा वापर शेतकरी करत आहेत. या पद्धतीत शेतकरी तीन ते चार पिके घेऊन कमी कालावधीत नफा मिळवत आहेत. या शेती पद्धतीमध्ये केवळ मशागत, पाणी किंवा खर्चात बचत होते असे नाही तर नफ्याचे प्रमाणही वाढते.अशी करतात पिकांची लागवड :

या पद्धतीच्या शेतीकरिता शेतकऱ्यांना आधी तीन ते चार पिकांची निवड करावी लागते. एक पीक जमिनीत म्हणजे आत येते तर दुसरे पीक जमिनीवर येतात अशी पिकांची निवड करावी. त्यानंतर द्राक्ष किंवा वेली सारख्या वाढणाऱ्या पिकांची निवड करावी. पिकांची निवड करताना माती परीक्षण, वायू ,पाणी यांचा आढावा घेऊनच ही पिक निवडावी.

उदाहरणार्थ जर तुम्ही आल्याची लागवड शेतीच्या जमिनीच्या पोतानुसार त्याची नीट लागवड झाल्यावर त्याच वेळी पालेभाजीची लागवड केली. याच शेतात तारेच्या सहाय्याने वेल असणाऱ्या पालेभाज्या फळभाज्यांची लागवड केली

जाते. अशामुळे संपूर्ण जमिनीला वेल असणाऱ्या पिकांमुळे आधार मिळतो. उन्हाच्या झळा थेट जमिनीवर पोहोचत नाहीत किंवा अवकाळी पाऊस झाला तरी पिकाला फटका बसत नाही. ही लागवड झाल्यानंतर मध्येच पपई सारख्या फळपिकांची लागवड केली जाते.

बहुउद्देशीय शेतीसाठी महत्वाचे मुद्दे : पिकाची निवड आणि लागवड महत्वाची. उन्हाळ्या ऐवजी हिवाळ्याची निवड करा.

एका वेळी तीन ते चार पीके यामध्ये घेतली जातात त्यामुळे सर्वांची लागवड करताना पिकांना फटका बसणार नाही याची खबरदारी घ्या. जवळच्या कृषी केंद्राचा सहकार्य जरूर घ्या. संपूर्ण वर्षाचे नियोजन करून पिकांची निवड ,लागवड, मशागत सर्व ठरवून घ्या.किती होइल फायदा ? : जर सर्व काही नीट झाले तर तुम्हाला नियमित उत्पन्नापेक्षा चार ते आठ पट नफा मिळू शकतो. या शेतीमुळे कमी खर्चात जास्त नफा मिळतो.

एका पिकामुळे दुसऱ्या पिकाला पोषकतत्व मिळतात. पाणी ,खते आणि मशागत यांची बचत झाल्याने होणारा फायदा ही मोठा आहे.

ढोबळमानाने हिशेब काढला तर एक वर्षात एक एकर शेतीत पाच ते सात लाख रुपयांची बचत होते. एकाच जमिनीत सर्व पिके घेतली जातात त्यामुळे नुकसानीचा धोकाही खूप कमी राहतो परिणामी नफा निश्चित वाढतो.

बटाटा लागवड तंत्रज्ञान

बटाटा पिकाचे लागवड पुणे, सातारा, नाशिक, अहमदनगर, बीड, औरंगाबाद आणि नागपूर या जिल्ह्यात केली जाते. बटाट्यामध्ये प्रथिने, चुना, फॉस्फरस या सारखी खनिजे, ब आणि क जीवनसत्वे भरपूर प्रमाणात असतात. बटाट्याचा उपयोग खाद्य पदार्थाशिवाय अनेक उद्योगधंद्यात मोठ्या प्रमाणात होतो.

हवामान : बटाटा हे थंड हवामानातील पिक आहे. या पिकास सरासरी १६ ते २१ सेल्सिअस तापमान लागते. पिकाच्या सुरवातीच्या काळात २४ सेल्सिअस पोषक असून बटाटे पोसण्याच्या काळात २० सेल्सिअस तापमान अनुकूल असते. बटाटे लागवडीच्या वेळी उष्ण हवामान व बटाटे पोसण्याचे वेळी थंड हवामान या पिकास पोषक असते.

जमीन : मध्यम ते हलक्या गाळाच्या जमिनीत बटाट्याची लागवड चांगल्या रीतीने करता येते. जमीन कसदार भुसभुशीत व उत्तम निचऱ्याची असावी. जमिनीचा सामू ६ ते ८ च्या दरम्यान असावा.

पूर्वमशागत : जमीन नांगरानी २० ते २५ सेंमी नांगरावी. १ महिनाभर जमिनीस उन्हाची ताप द्यावी. पुन्हा १ आडवी नांगरणी करावी. ढेकळे फोडण्यासाठी व जमीन समपातळीत आणण्यासाठी कुळवाच्या दोन तीन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी, जमिनीत हेक्टरी ५० गाड्या चांगले कुजलेले शेणखत पसरावे.

लागवडीचा हंगाम : बटाट्याची लागवड खरीप हंगामात जून, जुलै महिन्यात करतात व रब्बी हंगामात ऑक्टोंबर, नोव्हेंबर महिन्यात करतात.

वाण : कुफरी लवकर - ही ६५ ते ८० दिवसात तयार होणारी जात असून खरीप व रब्बी हंगामात घेतली जाते. या जातीचे बटाटे पांढरे शुभ्र आकर्षक वव मोठे असतात. या जातीचा बटाटा साठवणुकीत चांगला टिकतो. हेक्टरी उत्पादन २०० ते २५० क्विंटल असते. कुफरी चंद्रमुखी - ही जात ९० ते १०० दिवसात तयार होते. या जातीचे

बटाटे लांबट गोल व फिकट पांढरे असतात. साठवणुकीस ही जात उत्तम आहे. हेक्टरी उत्पादन २५० क्विंटल पर्यंत मिळते. कुफरी सिंदुरी - ही जात १२० ते १३५ दिवसात तयार होते. या जातीचा रंग फिकट तांबडा असून बटाटे मध्यम व गोल आकारचे असतात. ही जात साठवणुकीस उत्तम आहे. हेक्टरी उत्पादन ३०० क्विंटल पर्यंत मिळते. या शिवाय कुफरी बादशाह, कुफरी कुबेर, कुफरी ज्योती, अलंकार, कुफरी चमत्कार या जाती लागवडीस योग्य आहेत

बियाणाचे प्रमाण : बियाणे उत्तम दर्जाचे असावे. हेक्टरी १५ ते २० क्विंटल बियाणे लागवडीस पुरेसे असते. लागवडीपूर्वी बियाणे कॅप्टन ३० ग्रॅम आणि बविस्टोन १० ग्रॅम १० लिटर पाण्यात ५ मिनिटे बुडवून व नंतर लागवडीसाठी वापरावी.

लागवड : सरासरी बेण्याचे वजन जास्तीत जास्त २५ ते ३० ग्रॅम असावे. बेण्याचा आकार म्ध्याम असून बटाट्याचे आकारमानानुसार दोन ओळीतील अंतर ४५ ते ६० सेंमी आणि दोन बियांमधील अंतर १५ ते २० सेंमी ठेवावे. ट्रॅक्टरच्या सहहायाने सरी वरंबापद्धतीने लागवड करावी

खते व पाणी व्यवस्थापन : बटाटा पिकास लागवडीपूर्वीहेक्टरी १०० किलो नत्र, ६० किलो पालाशाची आवश्यकता असते. लागवडीनंतर १ महिन्याने ५० किलो प्रती हेक्टर नत्र खताची दुसरी मात्रा द्यावी. बटाट्याची मुले जमिनीत वरच्या थरात वाढत असल्यामुळे या पिकास पाण्याच्या पातळीच्या वेळेस कमी पाणी द्यावे. लागवडीनंतर पहिले पाणी हलके द्यावे. जमिनीला लगतच्या फांद्या वाढून त्यांची टोके फुगीर होऊ लागल्यावर व बटाटा पोसण्याच्यावेळेस ६ ते ८ दिवसांच्याअंतराने पाणी द्यावे. पिकाची वाढ पूर्ण झाल्यावर पाण्याच्यापाळ्या कमी कराव्यात

आंतरमशागत : बटाट्याच्या आंतरमाशागतीत तण काढणे व खुरपणी या बरोबर भर देणे हे महत्वाचे काम आहे. तीन चार वेळा खुरपणी करून जमीन भुशभूशित ठेवावी. खताचा दुसरा हप्ता देताना झाडांना मातीचा भर द्यावी.

रोग व कीड : करपा - पानवर काळे ठिपके पडून पाने गळतात. बटाट्यावर खोलगट चट्टे पडतात. उपाय - डायथेनएम ३० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मर - मोठी झाडे पिवळी व मलूल दिसतात. बुंध्याजवळ जमिनीलगतच्याभागावर बुरशीची वाढ झालेली दिसते. उपाय- पिकांची फरपालट आणि नियमित पाण्याच्या पाळ्या देऊन रोग आटोक्यात आणता येतो. जमिनीत नॅप्थलीन किंवा फॉरमॅलिन(१:५०) मिसळून दिल्यास रोगाचे बीज मरते. चारकोल रॉट किंवा खोक्या रोग - या रोगाचा प्रसार जमिनीतून होतो. जमिनीचे तापमान ३२ सेल्सिअस पेक्षाअधिक असल्यास ते रोगजतूना पोषक ठरते. या रोगामुळे साठवणीतील बटाटे नसतात. उपाय- जमिनीचे तापमान ३२ सेल्सिअस च्या वर चढण्यापूर्वी बटाट्याचीकाढणी करावी किंवा पाणी देऊन जमिनीचे तापमान कमी ठेवावे.

कीड : देठ कुडतरणारी अळी - राखी रंगाची अळी असून रात्रीचे वेळी खोडाजवळील भाग कुरतडतात. पाने व कोवळे देठ खातात. उपाय - या किडीच्या बंदोबस्तासाठी क्लोरेड एम ५ % पावडर हेक्टरी ५० किलो जमिनीवर सायंकाळी धुराळावी मावा व तुडतुडे - या किडीत पानातील अन्नरस शोषून घेतात. त्यामुळे पाने पिवळी पडतात. उपाय- लागवडीनंतर १५ दिवसांनी मिथिल डिमेटॉन १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून किंवा फॉस्फोमिडॉन ८५ डब्लू एमसी १० मिलि १० लिटर पाण्यात फवावरावे. बटाट्यावरील पंतग - ही किड बटाट्याचे अतोनात नुकसान करते. या किडीची सुरवात शेतातून होते. परंतु नुकसान हे साठवणुकीच्या काळात दिसून येते. या किडीच्या आळया पानात देठात व खोडात शिरून पोखरतात. आळया बटाट्यात शिरून आतील भाग पोखरून खातात. उपाय - या किडीच्या बंदोब्स्तासाठी कार्बारील ५० डब्लू.पी. १.५ किलो ७५० पाण्यात मिसळून फवारावे.

काढणी व उत्पादन : सर्व सुधारित तंत्राचा उपयोग करून बटाट्याचे पिक घेतल्यास लवकर तयार होणार्या जातीचे उत्पादन हेक्टरी २०० क्विंटल व उशिरा तयार होणाऱ्या जातीचे उत्पादन हेक्टरी २५० ते ३०० क्विंटल पर्यंत होऊ शकते.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१४९३ : ख्रिस्तोफर कोलंबस यांनी पोर्तो रिको हे बेट पहिल्यांदा पाहीले.
१७३८ : फ्रांस व ऑस्ट्रिया या दोन देशांदरम्यान शांती करारावर स्वाक्षरी करण्यात आल्या होत्या.
१७७२ : पेशवा माधवराव प्रथम यांचे छोटे बंधू नारायणराव ह्याने पेशवा पदाची सुत्रे सांभाळली होती.
१८०९ : फ्रान्सच्या आरमाराने बंगालच्या उपसागरात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या आरमाराचा पराभव केला.
१८८२ : अण्णासाहेब किर्लोस्करांचे 'संगीत सौभद्र' हे नाटक रंगभूमीवर आले.
१९०५ : लॉर्ड कर्झन यांनी राजीनामा दिल्यामुळे लॉर्ड मिंटो यांनी भारताचे १७ वे व्हॉइसरॉय व गव्हर्नर जनरल म्हणुन सूत्रे हाती घेतली.
१९१८ : लाटव्हियाने आपण (रशियापासून) स्वतंत्र असल्याचे घोषित केले.
१९२८ : वॉल्ट डिस्ने यांच्या 'मिकीमाऊस' या प्रसिद्ध कार्टूनचा 'स्टीमबोट विली' या चित्रपटाद्वारे जन्म
१९३३ : 'प्रभात'चा पहिलाच रंगीत चित्रपट 'सैरंध्री' प्रदर्शित झाला. मात्र चित्रपटाला हवा तसा प्रतिसाद न मिळाल्याने 'प्रभात'ने पुन्हा रंगीत चित्रपट काढला नाही.
१९५५ : भाक्रा-नांगल धरणाच्या बांधकामास सुरूवात झाली.
१९५६ : मोरक्को या देशाने स्वतंत्रता प्राप्त केली होती.
१९६२ : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाचे उद्घाटन झाले.
१९६३ : पहल्या पुश-बटण टेलिफोनची सेवा चालू झाली.
१९७२ : वाघाची भारताचा राष्ट्रीय पशु म्हणून निवड करण्यात आली.
१९९२ : ललित मोहन शर्मा यांनी भारताचे २४ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९३ : दक्षिण अफ्रिकेत २१ राजकीय पक्षांनी नवीन संविधानाला मान्यता दिली.
२००३ : आर्नोल्ड श्वार्णजेगर याची आजच्याच दिवशी कैलिफोर्निया या अमेरिकेतील प्रांताचा गवर्नर म्हणून निवड करण्यात आली होती.
२००५ : प्रधानमंत्री महेंद्र राजपक्षे यांची श्रीलंकेचे राष्ट्रपती म्हणून निवड करण्यात आली होती.
२०१३ : अमेरिकेची अंतराळ संस्था नासाने मंगळ ग्रहावर मावेन नामक यान पाठविले होते.
२०१५ : टेनिसपटू रॉजर फेडरर ने नोव्हाक जोकोविच ला पराभूत करून एटीपी वर्ल्ड टूर लंडन च्या उपांत्यफेरीत प्रवेश केला
२०१५ : भारतीय शटलर पी. व्ही. सिंधू ला काऊलुन येथे हाँगकाँग ओपन बॅटमिंटन स्पर्धेत स्पेनच्या कॅरोलिना मारीन हिने पहिल्याच फेरीत पराभूत केले.
२०१५ : भारतीय स्क्वॉश खेळाडू सौरव घोशाल चा बेलिबी येथे जागतिक स्क्वॉश स्पर्धेत ईंग्लंडच्या जेम्स विल्यस्ट्राप ने दुसऱ्या फेरीत पराभूत केले.
२०१७ : आजच्याच दिवशी भारताची मानुषी छील्लर हिने जागतिक सुंदरी हा पुरस्कार प्राप्त केला होता.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९८ : प्रबोध चंद्र बागची - भारताचा अतिप्राचीन इतिहास.
१९१५ : टेनिस खेळातील सर्वोच्च पुरस्कार प्राप्त करणारी ग्रँड स्लाम जिंकणारी प्रथम दक्षिणा अमेरिका खंडातील महिला खेळाडू अनिता लीजना हिचा जन्म.
१९२२ : रशियन कवी युरी नोरोजोव यांचा जन्म झाला.
१९०१ : व्ही. शांताराम - चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेते, पद्मश्री, दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (मृत्यू: १९९०)
१९०६ : मिनी कार चे निर्माते ॲलेक इझिगोनिस यांचा जन्म. (मृत्यू: २ ऑक्टोबर १९८८)
१९०९ : कॅपिटल रिकॉर्ड्स चे सहसंस्थापक जॉनी मर्सर यांचा जन्म. (मृत्यू: ६ ऑक्टोबर १९७६).
१९१० : बटुकेश्वर दत्त - क्रांतिकारक (मृत्यू: २० जुलै १९६५)
१९३१ : श्रीकांत वर्मा - हिन्दी कवी, पत्रकार व समीक्षक, राज्यसभा सदस्य (मृत्यू: १९८६)
१९४५ : महिंदा राजपक्षे - श्रीलंकेचे ६ वे राष्ट्रपती, सैन्यप्रमुख.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७७२ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव पेशवे - मराठा साम्राज्यातील ४ था पेशवा (जन्म: १६ फेब्रुवारी १७४५)
१८३० : इल्युमिनॅटि चे संस्थापक ॲडम वाईशप्त यांचे निधन. (जन्म: १७४८)
१८३५ : इंग्लिश अधिकारी व इतिहासकार कर्नल टॉड यांचे निधन.
१८९३ : ब्रिटीश पुरातत्वशास्त्री कनिंघम यांचे निधन.
१९३६ : भारताचे वकील व राजकारणी व्ही. ओ. चिदंबरम पिल्लई यांचे निधन. (जन्म: ५ सप्टेंबर १८७२)
१९६२ : नील्स बोहर - अणूचे अंतरंग स्पष्ट करणार्या शोधासाठी नोबेल पारितोषिक मिळवणारे डॅनिश पदार्थवैज्ञानिक (जन्म: ७ आक्टोबर १८८५)
१९७८ : प्रसिध्द बंगाली निर्देशक व अभिनेते धीरेंद्र गांगुली यांचे निधन.
१९९३ : पु. रा. भिडे तथा स्वामी विज्ञानानंद - लोणावळा येथील मन:शक्ती प्रयोग केंद्राचे संस्थापक.
१९९६ : कॉम्रेड श्रीनिवास गणेश सरदेसाई - समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक, भारतातील कम्युनिस्ट चळवळीचे आरंभापासूनचे नेते.
१९९८ : रामकृष्ण नारायण तथा बन्याबापू गोडबोले - साताऱ्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, वैद्यकीय अशा सर्वच क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे समाजसेवक.
१९९९ : रामसिंह रतनसिंह परदेशी - स्वातंत्र्यसैनिक, 'कॅपिटॉल बॉम्ब स्फोट' कटातील एक आरोपी.
२००१ : नारायण देवराव पांढरीपांडे तथा 'नाडेप काका' - गांधीवादी विचारवंत व 'नाडेप' कंपोस्ट खताचे जनक. गायीच्या शेणापासून कंपोस्ट खत तयार करुन त्यांनी रासायनिक खतांना पर्याय दिला. त्यांची पद्धत भारतातील अनेक कृषी विद्यापीठांनी स्वीकारली. (जन्म: खांडवा, मध्य प्रदेश).
२००६ : 'काव्यतीर्थ' हणमंत नरहर जोशी तथा कवी सुधांशु - मराठी कथाकार व कवी (जन्म: ६ एप्रिल १९१७)
२०१३ : भारतीय संगीतकार एस. आर. डी. वैद्यनाथन यांचे निधन. (जन्म: १५ मार्च १९२९)
२०१४ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते सी. रुधराय्या यांचे निधन.
२०१७ : अशोचक्र सन्मानित भारतीय वायुसेनेचे गरुड कमांडो शहीद ज्योतीप्रकाश निराला यांचे निधन झाले होते.

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत

जिल्हा बँकेचे २५ लाख लुटणाऱ्या टोळीत ग्रा. पं. सदस्यांचो मुले

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

कर्जबाजारी झालेल्या नानेगाव ग्रामपंचायत सदस्याच्या मुलानेच अन्य तिघांच्या मदतीने पाचोड-पैठण रोडवर दावरवाडी शिवारात जिल्हा बँकेच्या कर्मचाऱ्याकडील २५ लाखांची रोकड लुटल्याचे समोर आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही तासोंत टोळीचा पर्दाफाश करून चौघांना बेड्या ठोकल्या.

भारत राजेंद्र रूपेकर (३०), विष्णू कल्याण बोधने (२४, दोघे रा. नानेगाव, ता. पैठण), सचिन विठ्ठल सोलाट (२५, रा. राहुलनगर, उत्तर जायकवाडी) आणि विशाल दामोधर चांदणे (२४, रा. अखातखेडा, ता. पैठण) अशी आरोपींची नावे असल्याची माहिती पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी रविवारी (दि. १६) पत्रकार परिषदेत

दिली. आर-ोपींकडून रोख २५ लाख रुपये, स्विफ्ट कार, ८ मोबाईल असा ३१ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. भारत रूपेकर आणि विष्णू बोधने या दोघांची आई नानेगावची ग्रामपंचायत सदस्य आहे. मात्र दोघेच कारभार पाहायचे. फिर्यादी गणेश आनंदा पहिलवान (५९, रा. पैठण) हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दावरवाडी शाखेत अस्थायी कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. ते मार्केट यार्ड, पैठण येथील शाखेतून दावरवाडी शाखेकडे नियमितपणे रोख रक्कम वाहतूक करतात. शनिवारी (दि. १६) सकाळी ११.४० वाजता स्कूटीवरून २५ लाखांची रोख रक्कम गोणीत घेऊन दावरवाडीच्या दिशेने जात असताना काळ्या दुचाकीवरील दोघांनी स्कूटी अडवून रोकड लुटली. या प्रकरणी पाचोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले. पोलिस निरीक्षक विजयसिंह राजपूत यांनी पथकासह घटनास्थळी भेट देत तपास सुरू केला. दोन पथकांच्या मदतीने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक पुरावे आणि गोपनीय माहितीच्या आधारे चारही आरोपींचा माग काढत पैठण शहरात स्विफ्ट कारमधून (एमएच-२०-एफयू-३४७९) पळण्याच्या तयारीत असताना ताब्यात घेतले. ही कारवाई पोलिस अधीक्षक डॉ. राठोड, अपर अधीक्षक अन्नपूर्णा सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक विजयसिंह राजपूत, एपीआय संतोष मिसळे, पवन इंगळे, विठ्ठल डोके, विष्णू गायकवाड, शिवानंद बनगे, अनिल चव्हाण, अशोक वाघ, राहुल गायकवाड, अनिल काळे, सनी खरात, योगेश तरमाळे, जीवन घोलप यांनी केली. पुढील तपास सपोनि सचिन पंडित करत आहेत. रूपेकर कर्जबाजारी झालेला आहे. त्याच्यावर ट्रॅक्टरचे पाच लाखांचे कर्ज होते. ते फेडण्यासाठी कट रचला. फिर्यादी पहिलवान हे नेहमी बँकेची रोकड एका शाखेतून दुसरीकडे घेऊन जात असल्याचे पाहिले. हे पैसे लुटणे शक्य असल्याने त्याने अन्य तिघांना सोबत घेत कट रचला. पोलिसांनी त्याला पकडल्यानंतर त्याने मी कर्जफेड केल्याने माझ्याकडे पैसेच नाहीत, असा कांगावा केला. मात्र पोलिसांनी खाक्या दाखवताच चौघांनी पैसे काढून दिले.

थोडक्यात

अंबड पालिका निवडणूक सदस्यासाठी ४८ तर अध्यक्षासाठी चार अर्ज दाखल

अंबड । प्रतिनिधी

अंबड नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्रे स्विकारण्याची प्रक्रिया दि. १० नोव्हेंबरपासून सुरु झाली असून, पहिल्या ५ दिवसांत एकही नामनिर्देशन पत्र दाखल झाले नव्हते. १६ नोव्हेंबर रविवार पर्यंत अध्यक्ष पदासाठी चार अर्ज तर सदस्य पदासाठी ४८ अर्ज प्राप्त झाले. अशी एकूण ५२ नामनिर्देशन पत्रे प्राप्त झाल्याची माहिती तहसिलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली. यावेळी बोलताना निवडणूक अधिकारी म्हणाले की, प्रशासकीय सोयीसाठी तसेच उमेदवारांची गैरसोय होऊ नये म्हणून रविवारी देखील इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्विकारण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी तहसिलदार विजय चव्हाण यांच्यासह मुख्याधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मनोज उकिर्डे हे या प्रक्रियेवर लक्ष ठेवून आहेत.

मानवत नगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना भाजपची युती

परभणी । प्रतिनिधी

मानवत नगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना भाजपची युती होऊन सर्व जागा लढविण्याची घोषणा युतीच्या पदाधिकाऱ्यांनी केली. नगराध्यक्षपद हे शिवसेनेला सोडण्यात आले असून अंजली महेश कोक्कर या युतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार असणार आहेत. काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बालकिशन चांडक यांच्या निवासस्थानी झालेल्या पत्रकार परिषदेस भाजपचे माजी राज्यमंत्री सुरेश वरपुडकर, जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, शिवसेना अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सईद खान, भाजप जिल्हा उपाध्यक्ष अनंत गोलाईत, बालाजी कुऱ्हाडे, महेश कोक्कर आदी उपस्थित होते. भाजपचे सुरेश भुमरे, सुरेश वरपुडकर व शिवसेनेचे सईद खान यांनी भाजप शिवसेना युतीची घोषणा यावेळी केली. परंतु कोणता पक्ष किती जागा लढणार याची माहिती दिली नाही. नगराध्यक्ष पद हे शिवसेनेच्या वाट्याला गेले असून माजी नगराध्यक्ष महेश कोक्कर यांच्या पत्नी अंजली कोक्कर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. मानवत नगरपालिकेची निवडणूक ही विकासाच्या मुद्द्यावर लढविणार असल्याचे सेना भाजपच्या नेत्यांनी सांगितले. पत्रकार परिषद काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बालकिशन चांडक यांच्या घरी घेतल्याने ते काँग्रेस सोडणार का?, असा प्रश्न पत्रकारांनी उपस्थित केला. यावर उत्तर देताना चांडक म्हणाले, ''गाव, जिल्हा, राज्य, देशासाठी काम करणाऱ्यांच्या सोबत आम्ही सदैव आहोत. मात्र, काँग्रेस सोडण्याबाबत त्यांनी स्पष्ट उत्तर देण्यास टाळाटाळ केली.

शेकोटीच्या वादातून युवकावर चाकू हल्ला

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शेकोटीसाठी शेतातील लाकडे चोरल्याच्या संशयावरून एका युवकावर चाकूने हल्ला केला. तसेच त्याच्या चुलत्याला मारहाण करण्यात आल्याची घटना काटवन खंडोबा परिसरातील रस्त्यावर घडली. हल्ल्यात जखमी झालेल्या रोहीत रवी पंडीत (वय २१, रा. संजय नगर, काटवन खंडोबा) यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू असून त्यांनी दिलेल्या जबाबावरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

संतोष अशोक जाधव, अतुल अशोक जाधव (दोघे रा. टिळक रस्ता, अहिल्यानगर) आणि त्यांच्या इतर तीन अनोळखी साथीदारांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी रोहीत पंडीत हे गुरूवारी रात्री काम संपवून मित्रासोबत घरी जात होते. काटवन खंडोबामागील रस्त्यावर शेकोटी पेटलेली दिसल्याने तेथे ते शेकण्यासाठी थांबले. त्यांचा मित्र तेथून निघून गेल्यानंतर, संतोष जाधव तेथे आला. माझ्या मालकीचे लाकूड का आणले? त्याची शेकोटी का करतो? असे म्हणत त्याने रोहीतला मारहाण केली. यानंतर रोहीत तेथून घरी गेला. मात्र, काही वेळातच गल्लीतील एका मुलाने काटवन खंडोबाजवळ तुझे चुलते सुनील अशोक पंडीत यांचे भांडण सुरू आहे, अशी माहिती दिली. रोहीत तात्काळ घटनास्थळी धावला असता, संशयित आरोपी सुनील पंडित यांना मारहाण करत असल्याचे दिसले. रोहीतने मध्यस्थी केली असता त्याच्यावर चाकूसारख्या धारदार शस्त्राने वार केले आणि जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

पाटेगाव येथील महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय खेळाडूंचा गौरव सोहळा

पैठण । प्रतिनिधी

पाटेगाव येथील कौशल्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय खेळाडूंचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत गायकवाड होते. प्रमुख पाहुणे म्हणून शेखर पाटील, क्रीडा उपसंचालक छ. संजय गाढवे, जिल्हा क्रीडा अधिकारी जालना महेश खर्डेकर, सेवानिवृत्त क्रीडा अधिकारी परभणी यांनी उपस्थिती लावली. व्यासपीठावर क्रीडा शिक्षक प्रा. लक्ष्मण म्हस्के, सचिन सेवनकर, डॉ. सोमनाथ टाक, लक्ष्मण सपकाळ, गणेश भाकरे, कैलास वाघमारे, किशोर काटे, संदीप हंबर्डे उपस्थित होते. राष्ट्रीय स्तरावर कुस्ती स्पर्धेत सलग तीन वर्षे सिल्वर मेडल व एकदा गोल्ड मेडल मिळवणारी तृप्ती भवर, राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत सहभागी अमोल दत्तात्रय टेके व तुषार डांगे, किशोर गटातील पियुष गोरे, योगेश आघाव, पुणे कबड्डी असोसिएशनचे साईराज जाधव, कुस्तीपटू संकेत भवर, मैदानी स्पर्धेतील कुणाल राठोड यांचा सत्कार करण्यात आला. रसत्कारप्रसंगी खेळाडूंना मेडल, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देण्यात आले. कार्यक्रमाला बालाजी नलभे, नंदकिशोर पातकळ, स्वप्नजा पाटील, विजय सपकाळ, ोन्याबापू पालवे, भाऊसाहेब गायकवाड, प्रकाश कामडी, अमोल गायकवाड, निखिल पापुलवार, सतीश पवार, महेश गायकवाड, विठ्ठल त्रिभुवन यांची उपस्थिती होती.

राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते राजेश भालेराव यांचा सन्मान

जालना । प्रतिनिधी

व्हॉइस ऑफ मीडिया आणि इस्कॉन संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्य शिखर अधिवेशनात पत्रकार राजेश भालेराव यांना उत्कृष्ट जिल्हाध्यक्ष म्हणून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

पंढरपुर येथे आयोजित या अधिवेशनाला प्रमुख पाहुणे म्हणून राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची उपस्थिती होती. दि.१५ आणि १६ नोव्हेंबर या दोन दिवसीय राज्य शिखर अधिवेशनात संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, इस्कॉनचे राष्ट्रीय अध्यक्ष लोकनाथ, स्वागताध्यक्ष राणा सुर्यवंशी, राष्ट्रीय सचिव दिव्या भोसले, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, महिला प्रदेशाध्यक्ष रश्मी मारवाडी यांची उपस्थिती होती. या अधिवेशनात मान्यवरांनी पत्रकारिता क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व त्याची गरज याबाबत मार्गदर्शन केले.

तसेच पत्रकारांच्या हिताचे १४ ठराव पारित करण्यात आले. यावेळी राज्यातील व्हॉइस ऑफ मीडियाचे उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हाध्यक्षांचा राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यात ५ जिल्हाध्यक्ष आणि काही तालुकाध्यक्षांचा समावेश होता. व्हॉइस ऑफ मीडियाचे जालना जिल्हाध्यक्ष राजेश भालेराव यांनाही उत्कृष्ट जिल्हाध्यक्ष म्हणून यावेळी पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

शाल व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप होते. या कार्यक्रमात व्हॉइस ऑफ मीडियाचे जालना जिल्ह्यातील पदाधिकारी , भगवान साबळे, भरत मानकर, अशोक मिश्रा, राजेश भिसे, परतूर तालुकाध्यक्ष अजय देसाई, संजय उनगे, कैलास वैद्य यांच्यासह यांच्यासह सर्व तालुका कार्यकारिणीचे पदाधिकारी आणि सदस्य सहभागी झाले होते.

अहिल्यानगरमध्ये धुमाकूळ घालणारा नरभक्षक बिबट्या जेरबंद

ठार करण्याचे आदेश असताना शार्पशूटर येण्यापूर्वीच पिंजऱ्यात अडकला

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर तालुक्यातील कर्जुने-खारे शिवारात धुमाकूळ घालणारा बिबट्या जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले. या बिबट्याच्या हल्ल्यात एका पाच वर्षे मुलीचा मृत्यू झाला होता, तसेच एक आठ वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाला होता. या घटनेनंतर बिबट्याला ठार करण्याचे आदेश नागपूर येथील प्रधान मुख्य वन संरक्षकांनी दिले होते. शार्पशूटरची टीम पोहोचण्यापूर्वीच बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाला.अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये बिबट्यांची दहशत वाढली आहे. जिल्हाभरात सुमारे ११५० बिबटे असल्याचा अंदाज आहे. महिनाभरात जिल्ह्यात बिबट्याच्या हल्ल्यात तीन जणांचा मृत्यू झाला असून दोन जण जखमी झाले.

कर्जुने- खारे येथे १२ नोव्हेंबर २०२५ रोजी राहत्या घराजवळ बिबट्याने झडप घालून पाचवर्षीय मुलीला उचलून नेले होते. त्यात या मुलीचा मृत्यू झाला. त्यानंतर १४ नोव्हेंबरला ३ किमी अंतरावर इसळक शिवारात एका ८ वर्षीय मुलावर जीवघेणा हल्ला केला. त्यात हा मुलगा गंभीर जखमी झाला. त्यावर ग्रामस्थांनी रास्ता रोको करून बिबट्याला ठार करण्याची मागणी केली होती. त्यानंतर १५ नोव्हेंबरला नागपूर येथील प्रधान वन संरक्षकांनी ही मागणी मान्य करून बिबट्याला ठार करण्याचे आदेश दिले. या आदेशानुसार सोमवारी शार्प शूटरची टीम कर्जुने-खारे शिवारात दाखल होणार होती. परंतु त्यापूर्वीच पहाटे वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात पानसंबळ वस्ती येथे बिबट्या जेरबंद झाला. वन विभागाने तातडीने बिबट्याला स्थलांतरित केले आहे.

कोपरगाव नगरपालिका हद्द व येसगाव परिसरात नंदिनी प्रेमदास चव्हाण (वय ३ वर्षे) या चिमुरडीवर हल्ला करून तिला ओढून नेत ५ नोव्हेंबरला ठार केले होते. त्यानंतर १० नोव्हेंबरला शांताबाई अहिलाजी निकोले (वय ६३) या वृद्धेवरही त्याच बिबट्याने हल्ला करून तिला ठार केले होते. हा बिबट्या जेरबंद करण्यात यश येत नसल्याने, त्याला ठार करण्याचे आदेश होते. त्यानुसार श्रीरामपूर येथील डॉ. राजीव शिंदे या शार्प शूटरने बिबट्याला गोळी घालून ठार केले. कर्जुने-खारे येथे बिबट्या जेरबंद झाल्याची माहिती गाव परिसरात वाऱ्यासारखी पसरली. परंतु गावकऱ्यांनी हा बिबट्या पाहण्यापूर्वीच वन विभागाने त्याला स्थलांतरित केले. त्यामुळे जेरबंद केलेला बिबट्या नरभक्षकच आहे का ? किंवा दुसराच आहे ? असा प्रश्न ग्रामस्थांमधून विचारला जाऊ लागला. तसेच तुम्ही इतक्या गोपनीयतेने बिबट्या का स्थलांतरित केला. असे अनेक प्रश्न विचारले जाऊ लागल्याने प्रशासन विरुद्ध जनता असा तणाव निर्माण झाला.

वतनाच्या जमिनींसाठी संगमनेरातील दारोळे यांचे १०० दिवसांचे उपोषण

प्रशासनाचे लक्ष वेधण्यात यश; प्रमुख मागण्यांना मिळाली तत्त्वतः मान्यता

संगमनेर । प्रतिनिधी

महार वतन जमिनींच्या पुनर्प्राप्तीसाठी सतत लढा देणारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष आणि महार वतन हक्क सेवाभावी प्रतिष्ठानचे राज्याध्यक्ष शशिकांत दारोळे यांचे उपोषणाने रविवारी (१०० दिवस) शतक पूर्ण केले. ६ ऑगस्ट २०२५ पासून मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेले हे उपोषण राज्य प्रशासनाला हलवण्यास पुरेसे ठरले आहे.

उपोषणाला ६४ दिवस झाल्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. अव्वल मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत दारोळे यांच्या प्रमुख मागण्यांना तत्त्वतः मान्यता देण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होताच आदेश काढले जातील, असेही कळवले. दारोळे यांची मुख्य मागणी अनधिकृत खरेदी-विक्री रद्द करणे, साठेखत व कुलमुखत्यार पत्र नोंदणी बंद करणे, तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय कोणताही व्यवहार नोंदवू न देणेया सर्व मुद्द्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला. ब्रिटिश काळात गावसेवेच्या बदल्यात महार समाजाला मिळालेल्या या जमिनी कायमस्वरूपी मालकी नसून विक्री-हस्तांतरणावर बंदी होती. वतन रद्द झाल्यानंतर नजराणा भरून 'भोगवटदार वर्ग २' म्हणून जमीन पुनर्प्रदान करण्याची तरतूद असून, जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी व मूळ किमतीच्या २० ते ५० टक्के भरपाई आवश्यक आहे.

कल्याणस्वामी संस्थानचा कलशारोहन सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह

भाविकांनी लाभ घेण्याचे कीर्तनकार सोनाली दिदी यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील श्रीक्षेत्र कल्याणस्वामी संस्थानच्या मंदिराचा भव्य कलशारोहण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह, ११ कोटी नामजप, त्रिकाल हरिपाठ कार्यक्रमाचे दिनांक १८ नोव्हेंबर पासून आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध, नामांकित कीर्तनकाराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती, श्रीक्षेत्र कल्याणस्वामी संस्थानच्या अध्यक्षा रामायणाचार्य ह.भ.प. साध्वी सोनाली दिदि यांनी दिली. यावेळी संस्थांचे उपाध्यक्ष तथा महंत ईश्वर स्वरूप चैतन्य महाराज यांची उपस्थित होती. याप्रसंगी बोलताना साध्वी सोनाली दीदी म्हणाल्या, श्रीक्षेत्र कल्याण स्वामी संस्थान हे गेल्या पाचशे वर्षां पूर्वीचे जुने संस्थान आहे. या ठिकाणी वंशपरंपरागत नववी पिढी आज अध्यात्मिक, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करत आहे.

संस्थांनचा जीर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात आले असून अद्यावत दगडी मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. कल्याण स्वामी संस्थान मंदिराचा कलशारोहन व अखंड हरिनाम सप्ताह निमित्त सांप्रदायातील मान्यवर, नामांकित दिग्गज संस्थानला भेटी देणार आहेत. कलशारोहन कार्यक्रमासाठी नवसारी, सुरत येथील स्वामी श्रीहरी जीवनदास शास्त्री संस्थापक श्रीनारायण मुनी दिव्यधाम, महंत गुरुवर्य महंत शिवाजी महाराज, नारायणगड, न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री, भगवानगड, महामंडलेश्वर महादेवानंद भारती अश्वलिंग संस्थान, महंत विठ्ठल महाराज शास्त्री, गहीनाथ गडकर, शांतीब्रह्म ह.भ.प. नवनाथ बाबा, गोरक्षनाथ टेकडी, महंत स्वामी जनार्दन महाराज मच्छिंद्रगड, महामंडलेश्वर १००८ त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज, इंदूवासिनी संस्थान, महंत राधाताई सानप महाराज, आईसाहेब संस्थान, महासांगवी आदी साधू, संत उपस्थित राहणार आहेत. सप्ताहात मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर पासून सुरू होणाऱ्या सप्ताहात पहिल्या दिवशी समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदुरीकर यांचे कीर्तन, बुधवार दिनांक १९ नोव्हेंबर रोजी हभप आदिनाथ महाराज शास्त्री तारकेश्वरगड, गुरुवार दिनांक २० नोव्हेंबर नोव्हेंबर रोजी गोरक्षक रामायणाचार्य ह.भ.प. गुरुवर्य संजय महाराज पाचपोर, शुक्रवार दिनांक २१ नोव्हेंबर रोजी गुरुवर्य ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, पंढरपूर, शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी हभप अच्युत महाराज दस्तापुरकर, रविवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी धर्मगुरू अमृता आश्रम स्वामी महाराज, बीड यांचे कीर्तन, सोमवार दिनांक २४ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. साधी सोनाली दीदी, अध्यक्ष श्रीक्षेत्र कल्याण स्वामी संस्थान, चकलांबा यांचे कीर्तन होणार आहे. मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर रोजी कीर्तनकेसरी ह.भ.प. अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. या सप्ताहातील प्रत्येक कीर्तनास महाराष्ट्रातील ख्यातनाम, सुप्रसिद्ध गायक, वादक उपस्थित राहणार आहेत. परिसरातील महंत, गायक, वादक यांचीही या कार्यक्रमास उपस्थिती राहणार आहे.

टीसी हरवला आहे

वैशाली बाळू अडागळेङ्ग यांचा बारावी पास चा टीसी पाटोदा पुणे प्रवासादरम्यान हरवला आहे तरी सापडल्यास या क्रमांकावर संपर्क करावा. ९४२२६०६०९४

दैनिक
राज्य लोकतंत्र

बीड न.प.साठी चौरंगी लढतीची शक्यता !

नगराध्यक्ष पदासाठी राका' (श.प.गट) श्रीमती वाघमारे, भाजपाकडून श्रीमती घुमरे ,राका (अ.प.गट)श्रीमती पारवे तर वंचित बहुजन आघाडी कडून श्रीमती जोगदंड यांची उमेदवारी

बीड । प्रतिनिधी

भाजप, राष्ट्रवादी (श.प) आणि राष्ट्रवादी (अ. प)व या पक्षात बीड नगराध्यक्षपदाची चौरंगी लढत होईल असे चित्र सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी निर्माण झाले आहे.सौ.स्मिता विष्णू भाऊ वाघमारे यांना राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार) ने उमेदवारी दिली असून त्यांना बीड नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष , सभापती आणी नगरसेवक असा एकूण तीन टर्मचा अनुभव आहे. उमेदवारी दाखल केलेल्या महिलेमध्ये राजकीयदृष्ट्या त्या एकमेव अनुभवी

उमेदवार आहेत.तर भारतीय जनता पक्षाने डॉ सौ. ज्योती घुबरे यांना उमेदवारी दिली असून त्या भूलतज्ञ आहेत , अजितद पवार यांच्या राष्ट्रवादी कडून उमेदवारी देण्यात आलेल्या प्रेमलता पारवे या निवृत्त नायब तहसीलदार असून त्यांना महसूल प्रशासनाचा अभ्यास आहे. वंचित बहुजन आघाडी कडून श्रीमती जोगदंड यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. याशिवाय अन्य मागास प्रवर्गातील महिलांनीही उमेदवारी अर्ज दाखल केले असून यातील काहीना राजकीय पार्श्वभूमी असली तरी ती त्यांच्या पतीच्या,वडिलांच्या,भावाच्या माध्यमातून आहे.उमेदवारी देताना मागास प्रवर्गा अंतर्गत विविध जातींचाही विचार करण्यात आल्याचे दिसून येत आहे. यातील सर्वात आश्चर्यकारक उमेदवारी म्हणजे भाजपच्या डॉ.ज्योती घुमरे यांची असून त्या नाक-कान-घसा विकारतज्ञ डॉ.रवी घुमरे यांच्या सुविद्य पत्नी आहेत.तर सौ.प्रेमलता पारवे यांची ओळख त्या येथील सायं दैनिक सिटीझनचे संपादक शेख मुजीब यांच्या सासूबाई अशी करून दिली जात आहे.

सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत उमेदवारांची यादी कोणत्याच पक्षाने जाहीर केली नव्हती,ती पक्षाने ए.बी.फॉर्म दाखल केल्यावरच स्पष्ट झाली. अनुभवी नगरसेवकांना कोणत्या न कोणत्या पक्षाने उमेदवारी देतांना सामील करून घेतले आहे. काहीजण पुन्हा स्वगृही परतले असून काहींनी त्यांच्या पक्षाची वाट सोडून दुसऱ्या पक्षाची वाट धरली आहे.विविध राजकीय घराण्यातील पुढची पिढीही नशीब आजमावत असून तरुण उमेदवार देखील मोठ्या संख्येने निवडणूक लढवत आहेत.

माजलगावमध्ये नगराध्यक्षपदासाठी पाचप्रमुख पक्षांसह अपक्ष उमेदवारांचे उमेदवारी अर्ज दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी नामांकन दाखल करण्याचा अंतिम दिवशी प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या अधिकृत उमेदवारांची नावे जाहीर करून अर्ज दाखल केले. यासोबतच अनेक अपक्ष उमेदवारांनीही अर्ज दाखल करत स्पर्धेची दिशा अधिकच रोचक बनवली.

माजलगाव शहरातील राजकीय हालचालींना आता वेग आला असून माजलगावमधील राजकीय तापमान चढू लागले आहे.भाजपकडून संध्या ज्ञानेश्वर मेंडके यांनी पक्षाचे अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून मेहेरीन बिलाल चाऊस

या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस गटाने आतार मेहरुनबी खलील पटेल यांच्यावर विश्वास ठेवत उमेदवारी दिली आहे. शिवसेना (शिंदे गट) तर्फे सौ.राधा तुकाराम येवले यांनी ताकदीनिशी अर्ज दाखल केला. शिवसेना (उबाठा) गटाकडून सौ.सोनाली गोपाळ पैंजणे यांनीही उमेदवारी दाखल करत शिवसेनेतील दोन गटांमधील स्पर्धा अधिक तीव्र केली आहे. यासोबतच अपक्ष उमेदवार म्हणून सौ.मनिषा नितीन नाईकनवरे यांच्यासह इतर काही अपक्ष इच्छुकांनीही अर्ज दाखल केले आहेत.एकूणच,पाच प्रमुख पक्ष आणि अपक्ष उमेदवार अशा सर्व बाजूंनी लढवय्ये मैदानात उतरल्यानंतर नगराध्यक्षपदाची लढत बहुकोनी आणि चुरशीची बनली आहे.

भव्य शक्तिप्रदर्शन करत लोकविकास महाघाडीच्या सर्व उमेदवारांचे उमेदवारी अर्ज दाखल करताना निघालेल्या रॅलीने शहराचे वातावरण निघाले ढवळून

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याचा शेवटच्या दिवशी लोकविकास महाआघाडीच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी व पंधरा प्रभागातील ३१ उमेदवारांनी अंबाजोगाई शहरात जोरदार शक्तिप्रदर्शन करत आज सोमवार दि १७ रोजी आपले नामनिर्देशन अर्ज दाखल केले. मागील ९ वर्षांपासून अंबाजोगाई नगर परिषदेची निवडणूक झालेली नाही. त्यामुळे नगर परिषदेवर प्रशासक राज होते. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे लोकप्रतिनिधीचा नगर परिषदेवर

अंकुश नव्हता. राज्य निवडणूक आयोगाने नुकताच नगर परिषदेच्या निवडणूक कार्यक्रम जाहिर केला असून सोमवार दि १७ रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता.

नामनिर्देशन दाखल करण्याचा अंतिम दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व समविचारी पक्षाची लोकविकास महाआघाडी निर्माण करून या आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी व आघाडीचे सर्व ३१ उमेदवार यांनी आज आपले नामनिर्देशन दाखल केले. अंबाजोगाई शहरातुन काढलेल्या महाघाडीच्या महारॅलीने शहराचे संपूर्ण वातावरण ढवळून निघाले होते. या महारॅलीमध्ये हजारोच्या जनसमुदाय सहभागी झाला होता. यामध्ये नवयुवक , महिला, तसेच जेष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला. हे वातावरणात पाहून महाआघाडीचे सर्वेसर्वा राजकिशोर मोदी, नानासाहेब गाठाळ, माजी आमदार पृथ्वीराज साठे, बबनराव लोमटे , डॉ नरेंद्र काळे, महेंद्र निकाळजे, दीपक कांबळे, हाजी महमूद, खालेद चाऊस यांच्यासह महाआघाडीचे नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार हे भाराहून गेल्याचे दिसून येत होते.

अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी आरोपीस २० वर्ष कारावासाची शिक्षा

बीड । प्रतिनिधी

आरोपीने अल्पवयीन मुलीवर बळजबरीने लैंगिक छळ केल्याप्रकरणी शिरूर तालुक्यातील रहिवासी असलेल आरोपीस मा. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश-१ मा. एस.एस. घोरपडे साहेब यांनी दोषी ठरवून २० वर्ष सश्रम करावास व १०,०००/रुपये दंड व दंड न भरल्यास १ वर्ष सश्रम कारावास एवढयाा दंडाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल ॲड. अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले.

या प्ररकणी थोडक्यात हकिगत अशी की, दिनांक ०२.०९.२०२३ रोजी सायंकाळी ०६.३० शेतातून घरी आलोत तेव्हा माझी नात व नातु यांचे भांडण झाले तेव्हा नातु ओमकार हा नात हिस माझे समोर म्हणाला थांब तू काल काय केले ते घरच्यांना सांगतो असो म्हणाल्याने मी व नात हिस काय केले असे विचारले, असता नंदीनी ही मोठ्याने रडायला लागली, तिला समजावून सांगून विचारले असता तिने सांगितले की, दिनांक ३१.०८.२०२३ रोजी दुपारी दिड वाजण्याचे सुमारास मी शाळा सुटल्यानंतर घरी आले, त्यावेळी आरोपी हा दारामध्ये बसलेला होता. त्यावेळी दुसरा आरोपी याने त्याचे घरासमोर उभा राहुन मला आवाज देवून त्यांचे घरी बोलावून घेतले, त्यामुळे मी त्याचेकडे गेले व कशासाठी बोलावले असे विचारले असता आरोपी याने माझे हाताला धरून मला त्याचें घरामध्ये ६ ोवून गेला

दलित मित्राच्या लेकीला राष्ट्रवादी नगराध्यक्ष करणार -मा.आ.अमरसिंह पंडित

मनोहर वंजारे यांची कन्या प्रेमलता पारवे ५२ उमेदवारांसह महायुतीच्या उमेदवार

बीड । प्रतिनिधी

गेली तीन दिवस उमेदवाराच्या निवडीबद्दल वैचारीक, सामाजिक व राजकीय अभिसरण साधले जात असताना राष्ट्रवादी पक्षाकडून उमेदवार कोण ? या प्रश्नाचे उत्तर काल समोर आले. राष्ट्रवादीचे सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी दलित मित्र माजी जिल्हा परिषद सदस्य मनोजरराव वंजारे यांच्या कन्या निवृत्त नायब तहसिलदार प्रेमलता पारवे यांची

उमेदवारी जाहिर केली. सोबतच शिवसेना व शिवसंग्राम यांना सोबत घेत असल्याचे जाहिर करताना सक्षम राजकीय पर्याय देत असल्याचे माध्यमांना सांगितले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अनिल जगताप, शिवसंग्रामचे राज्य कार्यवाह

आम्ही प्रामाणिक आणि सक्षम मित्र निवडला -जगताप

आमच्याकडे भाजपचा देखील प्रस्ताव होता मात्र मतदारांच्या समोर मते मागताना प्रामाणिकता आणि सक्षम मित्र असेल तरच आम्ही निवडून येऊ शकतो असा आमचा विश्वास आहे. अशाप्रकारे आम्ही उपमुख्यमंत्री आमचे नेते ना.एकनाथ शिंदे यांच्याकडे प्रस्ताव पाठवला आणि त्यांच्या आदेशाने राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्यासोबत जाण्याचे नक्की केले असे जिल्हा प्रमुख अनिलदादा जगतापयांनी पत्रकारांना सांगितले.

आजवर क्षीरसागरांनी शहर लुटले आता विकासासाठी राष्ट्रवादी सोबत -प्रभाकर कोलंगडे

स्व.लोकनेते विनायकराव मेटे साहेबांनी क्षीरसागरांच्या हुकूमशाहीच्या विरोधात लोकशाहीत लढा दिला. शहर क्षीरसागरांनी अळीपाळीने लुटून खाल्ले, आता मात्र आम्ही असे होवू देणार नाही. राष्ट्रवादी सोबत खांद्याला खांदा लावून निवडणुक लढवणार आणि जिंकणार असे शिवसंग्रमचे राज्यकार्यवाह प्रभाकर कोलंगडे यांनी म्हटले.

शंभर टक्के प्रयत्न केले तर यश निश्चित -पोलीस अधीक्षक काँवत

परिस्थितीय क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या पदक विजेत्या खेळाडूंचा नवनीत कॉवत यांच्या हस्ते सत्कार

बीड । प्रतिनिधी

कोणतेही काम करताना १००% प्रयत्न तसेच शिस्त ,निष्ठा आणि काम हीच पूजा अशी भावना ठेवली तर यश निश्चित मिळते .बीड जिल्हा पोलीस दलाने आगामी काळातही अशीच गौरवास्पद कामगिरी करत रहावी असे प्रतिपादन बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या पदक विजेत्या खेळाडूंच्या सत्कार प्रसंगी बोलताना केले.

३६ व्या परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या पदकविजेत्या खेळाडूंचा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.३६ वी

परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धा छत्रपती संभाजीनगर येथे अत्यंत उत्साहात पार पडली असून, या स्पर्धेमध्ये बीड जिल्हा पोलीस दलातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध स्पर्धांमध्ये पदकांची लयलूट केली आहे. या चमकदार यशाबद्दल पदकविजेत्या सर्व खेळाडूंचा भव्य सत्कार व अभिनंदन सोहळा पोलीस मुख्यालयात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सर्व खेळाडूंचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. या प्रसंगी बोलताना त्यांनी म्हटले की ''कोणतेही काम करताना १००% प्रयत्न, शिस्त, निष्ठा आणि काम हीच पूजा अशी भावना ठेवली, तर यश निश्चित मिळते. बीड जिल्हा पोलीस दलाने पुढील काळातही अशीच उत्तरोत्तर गौरवास्पद कामगिरी करत राहावी. या कार्यक्रमाद्वारे बीडमध्ये पहिल्यांदाच पदकविजेत्या खेळाडूंसाठी स्वतंत्र अभिनंदन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पोलीस अधीक्षकांच्या या प्रेरणादायी कृतीमुळे खेळाडूंमध्ये नवचैतन्य, उत्साह आणि आत्मविश्वास संचारला आहे.

रिवॉर्डची घोषणा

खेळाडूंना प्रोत्साहन म्हणून पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी आर्थिक रिवॉर्ड जाहीर केले.यात सुवर्ण पदक विजेते प्रत्येकी ₹२,०००/-रौप्य पदक विजेते प्रत्येकी ₹१,५००/-कांस्य पदक विजेते प्रत्येकी ₹१,०००/-या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, खेळाडू व अधिकारी यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.याप्रसंगी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांचे समवेत अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार, पोलीस उपअधीक्षक (गृह) उमाशंकर कस्तुरे,जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व खेळाडू अंमलदार उपस्थित होते.

काँग्रेस नेते रवींद्र दळवी यांना बंधूशोक

अशोक अप्पा दळवी यांचे अल्पशा आजाराने निधन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे रहिवासी असलेले राष्ट्रीय स्तरावर काम करणारे काँग्रेसचे नेते रवींद्र दळवी यांचे बंधू अशोक आप्पा उत्तमराव दळवी यांचे सोमवारी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ६५ वर्षाचे होते. त्यांच्यावर दुपारी चार वाजता बीड शहरातील मोंढा स्मशानभूमीमध्ये अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

सामाजिक चळवळीत सक्रिय असलेले अशोक आप्पा दळवी हे गेल्या तीन चार दिवसापासून आजारी असल्याने छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णालयात दाखल त्यांना दाखल करण्यात आले होते. त्यांच्या मेंदूत रक्तस्राव झाल्याने ते सलग चार दिवस मृत्यूची झुंज देत होते. मात्र शेवटी डॉक्टरांना यश आले नाही. सोमवारी पहाटे त्यांचे निधन झाले. याची बातमी शहरात कळताच सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात होती. अशोक आप्पा दळवी यांचा मित्रपरिवार मोठा असल्याने सर्वजण हळहळ व्यक्त करत होते. दुपारी तीन वाजता बीड शहरातील त्यांच्या निवासस्थानापासून अंत्ययात्रा निघाली. चार वाजता त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, त्यापैकी एक डॉक्टर व एक इंजिनियर आहे. चार भावंडे असा मोठा परिवार असून निवृत्त सहा.पोलीस आयुक्त मनोहरराव दळवी, सहा.सरकारी वकील ॲड.उत्तमराव दळवी व जीवनदिप शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र दळवी यांचे ते बंधू होते. बीड शहरामध्ये त्यांचा मित्रपरिवार फार मोठा आहे. यावेळी प्रा. सुशीलाताई मोराळे, प्रा. प्रदीप रोडे ,अशोक हिंगे, दादासाहेब मुंडे, दिलीप गोरे ,नामदेवराव चव्हाण आदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी अंत्यविधीला नातेवाईक, डाव्या चळवळीतील कार्यकर्ते, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

पाटोदा तालुक्यात होणारा बाल विवाह रोखला

ग्रामीण विकास केंद्र व तालुका प्रशासनाची कारवाई

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील बांगरवाडी येथे नवरदेव मुलाच्या घरी तालुक्यातीलच एका गावातील १६ वर्षीय मुलीचा होणारा बाल विवाह ग्रामीण विकास केंद्र व तालुका प्रशासनाच्या तत्परतेने रोखण्यात यश आले आहे.

या बाबत माहिती अशी की तालुक्यातील बांगरवाडी येथे एका ३० वर्षीय युवकाशी त्याच्याच घरी तालुक्यातील एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचा बाल विवाह दिनांक १० नोव्हेंबर रोजी होणार असल्याची तक्रार ग्रामीण विकास केंद्र या संस्थे कडे प्राप्त झाली होती बाल विवाह बाबतची तक्रार प्राप्त होताच ग्रामीण विकास केंद्र या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा तालुका बाल संरक्षण समितीचे सदस्य समिर पठाण यांनी तात्काळ पाटोदा तहसीलदार दत्तात्रय निलावाड व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना होणारा बाल विवाह थांबवण्या बाबत कळविले तेव्हा तहसीलदार निलावाड यांनी याची दखल घेत अंगणवाडी पर्यवेक्षिका सुनिता गर्जे, ग्राम पंचायत अधिकारी वैशाली भालेराव यांना आदेशित करून बाल विवाह थांबवन्यासाठी कारवाई करण्याचे निर्देश दिले त्यानुसार अंगणवाडी पर्यवेक्षिका सुनिता गर्जे व ग्रामपंचायत अधिकारी वैशाली भालेराव व ग्रामीण विकास केंद्र चे कार्यकर्ते यांनी संबधित बालिकेच्या घरी भेट देऊन चौकशी केली व पंचनामा केला त्यावेळी मुलीच्या आईने आम्ही लग्नच करणार नव्हतोत कोणीतरी आमची खोटी तक्रार केली असल्याचे म्हटले व आम्ही आमच्या मुलीचे १८ वर्ष वय पुर्ण होण्या अगोदर लग्न करणार नाहीत व तिचे शिक्षण पूर्ण करु असे पंचा समक्ष लिहून दिले आहे.यावेळी सदर मुलीस बाल कल्याण समिती तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायपीठ बीड येथे हजर करण्या बाबत ग्राम पंचायत अधिकारी यांच्या मार्फत नोटीस देण्यात आली आहे.

बाल विवाह होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती त्यानुसार प्रशासनास तात्काळ कळवून प्रशासनाच्या सहकार्याने बाल विवाह रोखण्यात यश मिळाले आहे बाल विवाह होत असल्यास नागरिकांनी त्याची माहिती १०९८ या क्रमांकावर देऊन बाल विवाह मुक्त बीड जिल्हा या मोहिमेस सहकार्य करून सक्षम समाज निर्मितीसाठी योगदान देणे गरजेचे आहे.

समिर पठाण

अध्यक्ष ग्रामीण विकास केंद्र शिरूर कासार जिल्हा बीड

माजलगाव न.प.अध्यक्षपदासाठी भाजपाकडून संध्या ज्ञानेश्वर मेंडके यांना उमेदवारी जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

येथील नगर परिषद ओबीसी महिलेसाठी राखीव असुन नगराध्यक्षा पदासाठी भाजपाकडून कु.संध्या ज्ञानेश्वर मेंडके यांच्या उमेदवारीसह १३ प्रभागातील २६ उमेदवाराची घोषणा करण्यात आली आहे.

माजलगाव नगरपरिषद अध्यक्षपद हे ना.मा.प्र.महिलेसांठी राखीव असुन भाजपाने उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी उशिरा नगराध्यक्षा पदासाठी भाजपाचे निष्ठावंत नेते ज्ञानेश्वर मेंडके यांची मुलगी कु.संध्या ज्ञानेश्वर मेंडके यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली असुन शहरातील २३ प्रभागातील उमेदवारांची अंतिम यादी पुढीलप्रमाणे

प्रभाग क्रमांक १- अ. ना. मा. प्र. महिला. सौ. सुमन माणिकराव मुंडे,ब. - सर्वसाधारण सतीश रामचंद्र जोशी,

प्रभाग क्रं.०२ अ. अनुसुचित जाती महिला शितल धिरज अलझेंडे,ब. सर्वसाधारण सय्यद कादीर सय्यद अहमद

प्रभागक्रमांक ०३- अ. ना.मा.प्र. आसेफ इनामदार खाजा,ब-सर्वसाधारण महिला स्वाती सचिन डोंगरे,प्रभाग क्रमांक ०४ -अ. ना मा. प्र.दिपक जालिंदर मेंडके,ब- सर्वसाधारण महिला कविता विनायक रत्नपारखी,प्रभाग क्रंमाक ०५-अ. सर्वसाधारण महिला स्नेहा विनोदकुमार लड्डा.ब - सर्वसाधारण प्रताप सोनाजीराव रांजवण,प्रभाग क्रंमाक ०६ -अ. सर्वसाधारण महिला उषा विशाल शिंदे,ब. सर्वसाधारण दत्तात्रय प्रल्हाद क्षिरसागर, प्रभाग क्रंमाक ०७-अ. ना. मा. प्र. महिला सुशिला अशोक आळणे,ब-सर्वसाधारण संतोष सुभाषराव सोळंके, प्रभाग क्रंमाक ०८-अ. ना मा. प्र. महिला सरस्वती वसंत अलकुंटे,ब. सर्वसाधारण शेख मोहसीन सु. इनुस,

प्रभाग क्रंमाक ०९.-अ. ना. मा. प्र.भगवान

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

‘मालक’ बनायला शिकवा; शिक्षक अमोल हंकारे यांचा मोलाचा सल्ला

पुणे । प्रतिनिधी

सोनाजी गाढवे : डिजिटल युगाने जगण्याची संकल्पनाच बदलून टाकली आहे. टिव्ही, कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोबाईल, रेडिओ यांसारखी साधने आज मानवी जीवनातील मूलभूत गरजांमध्ये गणली जातात. तंत्रज्ञानामुळे ज्ञानाचा महासागर सर्वांसाठी उघडला असला, तरी याच तंत्रज्ञानाचे दुष्परिणामही दिवसेंदिवस स्पष्ट होताना दिसत आहेत. डिजिटल तंत्रज्ञानचा ‘गुलाम’ बनू न देता, त्याचा ‘मालक’ बनण्यास शिकवणे हे गरजेचे आहे आसे मत शिक्षक अमोल हंकारे यांनी व्यक्त केले. डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापरामुळे शाळेतील विद्यार्थ्यांवर होणारे परिणाम त्यांनी अधोरेखित केले.

तंत्रज्ञान हे एका दुधारी शस्त्रासारखे आहे. ते चांगले की वाईट, हे पूर्णपणे आपण ते कसे वापरतो यावर ठरते. एकीकडे ते ज्ञानाचे भांडार उघडते, तर दुसरीकडे अतिवापरामुळे ते मुलांचे लक्ष विचलित करते आणि त्यांना मैदानी खेळांपासून दूर नेते. एक शिक्षक म्हणून, आजच्या युगात मुलांना तंत्रज्ञान ‘वापरण्यापासून’ रोखणे हा उपाय नाही, कारण तेच भविष्य आहे. त्याऐवजी, त्याचा ‘योग्य’, ‘सुरक्षित’ आणि ‘जबाबदार’ वापर कसा करायचा, याचे मार्गदर्शन करणे हीच आपली खरी जबाबदारी आहे.

टिव्ही, कॉम्प्युटर, लॅपटॉप, रेडिओ,मोबाईल ही महत्वाची डिजिटल साधने मनुष्याच्या मूलभूत गरजा बनल्या आहेत असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. या डिजिटल साधनाच्या मायाजाळातून बालकेही सुटलेली नाहीत. बालके तासनतास टिव्ही, मोबाईल मधून डोके वर काढत नाहीत. यामुळे बालकांना विविध आजार आणि समस्यांना सामोरे जावे लागत आहे. डिजिटल साधनांच्या अतिवापराने डोळ्यांचे आजार,चिडचिडेपणा, स्वमग्नता या समस्या भेडसावू लागल्या आहेत. यावर वेळीच उपाययोजना करणे काळाची गरज आहे.

डोळ्यांवर परिणाम, रेटिनावर परिणाम, नैराश्य, हायपरएक्टिव्हिटी डिसऑर्डर, एडीएसडी, ऑटिझम, झोपेचा अभाव, मुलांना झोप बरोबर येत नाही, मुल चिडचिड करायला लाग मनशिक संतुलन ठीक राहत नाही मुलांमध्ये असे आजार निर्माण होतात. याबाबत शिक्षकअमोल हंकारे म्हणाले की, डिजिटल तंत्रज्ञान मुळे अभ्यास, मैदानी खेळ आणि स्क्रीन-टाईम यांच्यात ‘संतुलन’ साधणे, हेच आजच्या काळातील सर्वात मोठे आव्हान आहे. मुलांना तंत्रज्ञानाचे ‘गुलाम’ बनू न देता, त्याचा ‘मालक’ बनण्यास शिकवणे, हेच माझे ध्येय आहे. आणि आपल्या सगळ्यनचे असले पाहिजे. अशी भावना त्यांनी सांगितली.

नमो टुरिझम नव्हे छत्रपती शिवाजी महाराज टुरिझम हवे - खासदार निलेश लंके

पुणे : गडकिल्ले हे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रम आहेत. या गडकिल्ल्यांकडे केवळ पर्यटन स्थळ म्हणून न पाहता त्यांचे पावित्र्य जपले पाहिजे. गडकिल्ल्यांच्या ठिकाणी सुरू करण्यात येणार्या केंद्रांना 'नमो टुरिझम' हे नाव देण्यात येणार आहे. त्याऐवजी छत्रपती शिवाजी महाराज टुरिझम असे नाव द्या, अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी पत्रकार परिषदेत केली.

खासदार लंके म्हणाले, गडकिल्ले हे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रम आणि मावळ्यांचा इतिहास सांगतात. मात्र, आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचा विसर पडला आहे. ज्यांना त्यांच्या नावाने राजकारण करायचे आहे, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श घेतला पाहिजे. समाजकारण आणि राजकारण करताना छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेतले जाते. त्यांच्या आदर्शांवरच आपण आज उभे आहोत. मात्र, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देणार्या गडकिल्ल्यांची दुरवस्था झाली आहे. राज्य सरकार आणि केंद्र सरकारने गडकिल्ल्यांच्या दुरवस्थेकडे लक्ष दिले पाहिजे. हे गडकिल्ले किल्ले प्रेरणास्थान आहेत. त्यामुळे हे गडकिल्ले आगामी काळात भक्कमपणे उभे राहणे आवश्यक आहे. किल्ल्यांवरील अतिक्रमणे काढली गेली पाहिजेत. केंद्राची कॅबिनेट मंत्रिमंडळ बैठक एक दिवस रायगडावर घ्यावी, ज्यामुळे एक नवीन आदर्श उभा राहील, अशी मी संसदेच्या अधिवेशनात मागणी केली होती. असेही त्यांनी यावेळी सांगितले.

सिंहगडावर रविवारी स्वच्छता मोहिम

गडकिल्ले स्वच्छता आणि संवर्धन मोहिमेअंतर्गत २३ नोव्हेंबर रोजी सिंहगडावर स्वच्छता मोहिम राबवण्यात येणार आहे. सकाळी सात वाजता गडाच्या पायथ्यापासून या मोहिमेला सुरूवात होणार आहे. १६ मार्च रोजी सुरू झालेल्या या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत धर्मवीर गड, रायरेश्वर, रामशेज, तिकोना, प्रतापगड आणि भुदरगड अशा विविध गडांवर स्वच्छता मोहिम राबवण्यात आली आहे. या मोहिमेमध्ये केवळ स्वच्छता न करता किल्ल्यावरील जीर्ण झालेली मंदिरे, किंवा अन्य दुरावस्थेतील ऐतिहासिक गोष्टींच्या संवर्धनासाठी केंद्र सरकार आणि पुरातत्व विभागाल पत्र पाठवून त्याचा पाठपुरावा करण्याचे काम केले जात असल्याचे लंके यांनी सांगितले.

खडकी बैलगाडा शर्यत : गोविंदशेठ खिलारी व संतोष सातपुते ठरले मानकरी

मंचर : मुक्तादेवी यात्रा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर खडकी (ता. आंबेगाव) येथे पारंपरिक बैलगाडा शर्यत उत्साहात पार पडली. तब्बल ७६० बैलगाड्यांनी त्यात सहभाग घेतला. विशेष आकर्षण एक नंबर बैलगाड्यांची फायनलमध्ये पहिल्या दिवशी उद्योजक गोविंदशेठ खिलारी, संतोष सातपुते भराडी हे मोटारसायकलचे मानकरी ठरले.

चार दिवस चाललेल्या या शर्यतीत दररोज वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये बैलगाडा विजेत्यांनी बाजी मारली. पहिल्या दिवशी जगन्नाथ विठ्ठल जाधव यांनी प्रथम क्रमांक पटकावला. दुसरा क्रमांक जितेंद्र सिताराम माळूजे कुरवंडी, तर तिसरा क्रमांक तन्मय तानाजी गाडे आणि गौरव संतोष लोहोटे साकोरे यांना मिळाला.

दुसऱ्या दिवशी धनंजय दादाभाऊ लांडे व रमण महादू निलख लांडेवाडी यांनी संयुक्तरीत्या पहिला क्रमांक मिळवला.दुसरा क्रमांक अक्षय गायकवाड वडगाव पाटोळे आणि तिसरा क्रमांक उज्वला मनसुख वळती यांनी पटकावला.तिसऱ्या दिवशी पहिला क्रमांक धोंडीभाऊ बांगर - शंकर थोरात (पिंपळगाव), दुसरा क्रमांक राजेश नाना बांगर पिंपळगाव, तिसरा क्रमांक वैभव तोत्रे सालगाव यांनी पटकावला. चौथ्या दिवशी नानासाहेब महादू गुळवे-महादू मारुती भोर (खडकी) यांच्या जुगलबंदीने अव्वल क्रमांक मिळवला. दोन नंबर फळीफोडमध्ये साईराज दाभाडे देवगाव, तीन नंबर फडीफळ अभिमन्यू पोखरकर. विशेष आकर्षण एक नंबर बैल गाड्यांची फायनलमध्ये पहिल्या दिवशी उद्योजक गोविंदशेठ खिलारी, संतोष सातपुते भराडी हे मोटारसायकलचे मानकरी ठरले. दुसऱ्या दिवशीचे मानकरी अनुपशेठ मुळे/ बिभीषण भोसले मांजरवाडी, तिसऱ्या दिवसाचे मानकरी माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील निरगुडसर.चौथ्या दिवसाचे मानकरी भैरवनाथ बैलगाडा संघटना/ विश्वनाथ पवार हे वरील चारही गाडे मालकांना एक नंबर फायनालाचा मान देऊन मोटारसायकलची रक्कम देण्यात आली. घाटाचा महाराज अरबूज कोहिनकर जुगलबंदी खेड व मानकादेवी मित्र मंडळ / नारायणशेठ मोरे (सरपंच) खडकी जुगलबंदी यांनीही लक्षवेधी कामगिरी केली. पारंपरिक खेळसंस्कृती जपणाऱ्या या स्पर्धेला उपस्थितांचा मोठा प्रतिसाद लाभला. खडकी ग्रामस्थांनी बैलगाडा शर्यतीचे नियोजन केले.

विश्वकर्मा विद्यापीठात पर्यायी विवाद निराकरण आणि आरोग्य क्षेत्र परिषद २०२५ चे आयोजन

पुणे : भारताच्या आरोग्य क्षेत्रात वाढत्या कायदेशीर गुंतागुंतीच्या प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर, तसेच त्वरित, संवेदनशील आणि तज्ज्ञ-आधारित विवाद निराकरणाची गरज लक्षात घेता, पुण्यातील अग्रगण्य विद्यापीठ, विश्वकर्मा विद्यापीठाच्या विधी विभागाने कायदा व आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांना एका मंचावर आणत पर्यायी विवाद निराकरण (एडीआर) आणि आरोग्यक्षेत्र परिषद २०२५ चे आयोजन केले. या परिषदेमध्ये आरोग्य क्षेत्रातील विवादांमध्ये एडीआरचे वाढते महत्त्व आणि त्यातील संभाव्य बदल यावर चर्चा करण्यात आली.

सदरील परिषद विद्यापीठाच्या सम्यक अर्थात मध्यस्थी व लवाद केंद्राच्यावतीने आयोजित करण्यात आली होती. मार्च २०२५ मध्ये स्थापन झालेले सम्यक हे मध्यस्थी व लवाद विषयातील कौशल्यविकास, शिक्षण आणि प्रत्यक्ष प्रशिक्षणाचे व्यासपीठ म्हणून कार्यरत आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन पुण्याचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. एम. के. महाजन यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. हेमंत झंजाड आणि ज्येष्ठ वकील ड. प्रताप परदेशी उपस्थित होते.उद्घाटनप्रसंगी बोलताना मा. न्यायमूर्ती एम. के. महाजन म्हणाले, न्यायाधीश म्हणून एडीआरविषयी जनजागृती निर्माण करणे ही माझी केवळ कायदेशीर नव्हे तर घटनात्मक जबाबदारी आहे. मध्यस्थी आणि लवादाच्या प्रक्रियेमध्ये तरुण वकिलांचे भवितव्य अत्यंत उज्ज्वल आहे.या परिषदेमध्ये डॉ. सुरेखा कश्यप, श्री. अनिरुद्ध राजूरकर, डॉ. प्रसाद ठाकुरदेसाई डॉ. उज्वला शिंदे आणि ॲड. अमन दत्ता यांचा परिसंवादात सहभाग होता. या चर्चेचे समन्वयन ड. तेजस हुळे यांनी केले. चर्चेमध्ये वैद्यकीय निष्काळजीपणा, रुग्ण तक्रारी, संस्थात्मक वाद, नियामक प्रश्न इत्यादी विषयांवर एडीआरचा उपयोग कसा होऊ शकतो यावर विचार विनिमय झाला.विश्वकर्मा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. मुकुंद कुलकर्णी यांनी संस्थात्मक दृष्टीकोन मांडताना सांगितले की, सम्यकसारखी व्यासपीठे ‘मानवी क्षमतेचा जास्तीत जास्त विकास’ या आमच्या संस्थात्मक ध्येयाशी सुसंगत असून कायदे शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल आहे. विधी विभागाच्या अधिष्ठाता डॉ. अपूर्वा भिलारे यांनी कायद्याच्या शिक्षणातील बदलांचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले, एडीआर ही काळाची गरज आहे आणि म्हणूनच विद्यार्थ्यांना त्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. पॅनल सदस्यांनी मांडलेल्या विचारांनी विद्यार्थ्यांचे ज्ञान अधिक समृद्ध झाले आहे. परिषदेचा समारोप करताना, सम्यक हे मध्यस्थी आणि लवाद केंद्र एक समग्र परिसंस्था तयार करण्याचे उद्दिष्ट बाळगत आहे. हा पुढाकार आरोग्य क्षेत्रासारख्या विशेष क्षेत्रांमध्ये न्यायप्रवेश सुलभ करण्यास आणि अनुभवाधारित शिक्षणाला चालना देण्यास मदत करणार आहे.

शरदवाडीच्या सरपंचपदी पुष्पा गांजे बिनविरोध

शिरूर । प्रतिनिधी

जांबुत : जांबुत (ता. शिरूर) ग्रामपंचायत मधून विभाजन झालेल्या शरदवाडी ग्रामपंचायतच्या सरपंचपदी पुष्पा गांजे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल परिसरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. आधीच्या काळात निवडून आलेल्या सरपंच हरिभाऊ सरोदे यांनी आपला राजीनामा सादर केल्यानंतर शुक्रवार (दि. १४) रोजी पार पडलेल्या निवड प्रक्रियेसाठी पुष्पा गांजे यांचा एकमेव नामनिर्देशन अर्ज आला होता. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून राजेंद्र पोटकुले, व ग्राममहसूल अधिकारी रुपेश भोर, ग्रामसेवक पोपट शेलार यांनी काम पहिले.

शरदवाडी (ता. शिरूर) येथील सामाजिक कार्यकर्ते पप्पू गांजे यांचे शरदवाडीसह परिसरात मोठे सामाजिक योगदान असल्याने ग्रामस्थांनी विश्वासूपणे त्यांच्या पत्नी पुष्पा गांजे यांचेकडे गावच्या प्रमुख पदांची सूत्रे दिली असुन येणाऱ्या काळात सर्व ग्रामस्थांना सोबत घेऊन गावच्या विकासासाठी आपण सकारात्मक भुमीका घेऊन मूलभूत विकासकामे करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी ग्रामस्थांकडून त्यांचा भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या निवडीबद्दल त्यांचे माजी आमदार पोपटराव गावडे, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र गावडे, माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष पोकळे, अरुणा घोडे, सावित्रा थोरात, सरपंच दत्तात्रय जोरी, जानवी उचाळे, नवनाथ निचित, संतोष पिंगट, उपसरपंच बाबुराव जोरी यांचेसह सर्व ग्रामपंचायत सदस्य व विकास सोसायटीचे पदाधिकारी यांनी अभिनंदन केले. प्रसंगी लहू साबळे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार चैतन्य गांजे यांनी मानले.

बारामती नगराध्यक्ष पदासाठी अजितदादांनी उमेदवारी देताच भाजपकडूनही उमेदवाराची घोषणा

बारामती । प्रतिनिधी

बारामती नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून सचिन सातव यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. सचिन सातव यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेसकडून घड्याळाच्या चिन्हावर देण्यात आली आहे. अजित पवार गटाकडून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराचा सस्पेन्स ठेवण्यात आला होता. आता तो दूर झाला असून सचिन सातव हे बारामती सहकारी बँकेचे विद्यमान अध्यक्ष आहेत. शिवाय यापूर्वी सचिन सातव हे बारामती नगरपरिषदेचे नगरसेवक देखील राहिले आहेत.

दरम्यान, बारामती नगरपरिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीमधून नगरअध्यक्षपदासाठी गोविंद देवकाते यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. भाजप बारामती नगरपरिषद निवडणुकीत ३० जागा लढवणार आहे. भाजपने गोविंद देवकाते यांना उमेदवारी देऊन ओबीसी चेहरा निवडणुकीच्या रिंगणात उतरवला आहे. दरम्यान, बारामतीमध्ये अजित पवारांनी सर्व उमेदवार जाहीर केले असले, तरी महाविकास आघाडीकडून अजून उमेदवार जाहीर करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे नगराध्यक्षपदाचा उमेदवार उजूनही गुलदस्त्यात आहे. दुसरीकडे बसपाकडून नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार जाहीर करण्यात आला आहे. काळूराम चौधरी यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

पुण्यात भयंकर रेल्वे अपघात, मांजरीजवळ डेमू ट्रेनने ३ तरुणांना चिरडले

पुणे : शहराच्या मांजरी बुद्रुक रेल्वे स्थानकाजवळील गोपाळपट्टी परिसरात रविवारी (१६ नोव्हेंबर) रात्री साडेआठ ते नऊ वाजण्याच्या सुमारास भयंकर रेल्वे अपघात घडला. पुणे-दौंड डेमू पॅसेंजर ट्रेनने रेल्वे रुळावर असलेल्या तीन तरुणांना जोरदार धडक दिली. या धडकेत तिघांचाही जागीच मृत्यू झाला. हा अपघात इतका भीषण होता की, मृतदेहाचे अवयव विखुरले गेले.

मृत्यू झालेल्या तरुणांची नावे प्रथमेश नितीन तिंडे (१८, काळेपडळ, हडपसर), तन्मय महेंद्र तुपे (१८, विशाल कॉलनी, गोपाळपट्टी, हडपसर) आणि तुषार शिंदे (१९, गोपाळपट्टी, हडपसर) अशी आहेत. हे तिघेही हडपसर भागातील स्थानिक राहणारे होते. मिळालेल्या अधिक माहितीनुसार, अपघाताच्या वेळी एकूण पाच जण रेल्वे रुळावर एकत्र होते. ट्रेनच्या धडकेत तिघांना जीव गमावावा लागला, तर उरलेले दोन जण घाबरून घटनास्थळावरून पळून गेले. अपघाताची माहिती मिळताच हडपसर आणि रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी त्वरित धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी ससून रुग्णालयात पाठवण्यात आले. हे तरुण रेल्वे रुळावर नेमके कशासाठी गेले होते, याबाबत पोलिस तपास करीत आहेत. अपघाताची नोंद हडपसर पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यू म्हणून करण्यात आली असून, दोन साक्षीदारांना शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे. मृत तरुणांच्या कुटुंबीयांना घटनेची माहिती देण्यात आली असून, या तरुणांच्या अकाली मृत्यूमुळे कुटुंबियांना मोठा धक्का बसला आहे.

अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला, सिंहगड परिसरात भीतीचं वातावरण

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील सिंहगड रोडवर अज्ञात व्यक्तीचा मृतदेह सापडल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. वडगाव पुलाजवळील ओढ्यात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला होता. शहरातील दुसरी घटना घडल्यामुळे शहरवासीयांमध्ये खळबळ उडाली आहे. सिंहगड रोडवरील कॅनलजवळ एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह सापडला असून, या घटनेमुळे परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

प्राथमिक माहितीप्रमाणे, हा मृतदेह अनेक दिवसांपासून या ठिकाणी पडलेला असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मृतदेहाची अवस्था गंभीर विघटन झालेली असल्यामुळे ओळख पटवणे कठीण झाले आहे. घटनास्थळी पुणे पोलिसांनी तत्काळ धाव घेतली असून, पंचनामा व तपासकार्य सुरू आहे. मृत व्यक्तीची ओळख, मृत्यूचे

कारण व नेमकी घटना कशी घडली याचा शोध पोलीस घेत आहेत. दुसऱ्या घटनेत वडगाव ब्रिज शेजारील ओढ्यात आढळलेल्या मृत व्यक्तीचे वय ५० च्या आसपास असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. घटनास्थळी पोलिस आणि फॉरेन्सिक टीम्स दाखल झाली असून अधिक तपास सुरु आहे.

पीएच.डी. प्रवेशासाठी मुलाखतींचा टप्पा सुरू

पुणे । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभाग तसेच संलग्न संशोधन केंद्रातील पीएच.डी. प्रवेशासाठी मुलाखतींची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. संबंधित प्रक्रिया दि. १७ नोव्हेंबर ते दि. १५ डिसेंबरदरम्यान पार पाडावी, असे स्पष्ट निर्देश विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी दिले आहेत.

डॉ. रासवे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, पीएच. डी. प्रवेश प्रक्रिया पुढील फेरीकरिता पात्र विद्यार्थी तसेच पीएच. डी. प्रवेश प्रक्रिया २०२४-२५ मधील पहिल्या फेरीत निवड न झालेले, पेट परीक्षा पात्र व पेट परीक्षेतून सूट मिळालेले पात्र विद्यार्थी यांना रिक्त जागांचा तपशील पाहून संशोधन केंद्र निवडण्यासाठी १४ नोव्हेंबरपर्यंत संधी देण्यात आली होती. त्यानुसार विद्यार्थ्यांची यादी व विभागीय संशोधन समितीमधील कुलगुरू नामनिर्देशित दोन प्रतिनिधी (सर्वसाधारण व मागासवर्गीय) यांची नावे महाविद्यालय, विद्यापीठ विभाग यांच्या बीओडी लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यानुसार, सर्व संशोधन केंद्रांनी मुलाखत प्रक्रिया पूर्ण करून त्याचा अहवाल मुलाखतीनंतर तीन कार्यालयीन दिवसात पीएच. डी. ट्रॅकिंग प्रणालीवर ऑनलाइन पद्धतीने जमा करणे गरजेचे आहे. सर्व मान्यताप्राप्त संशोधन केंद्रांना विभागाच्या, महाविद्यालयाच्या बीओडी लॉगीनमध्ये संबंधित संशोधन केंद्र निवडलेल्या विद्यार्थ्यांची अद्ययावत यादी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार यादीतील विद्यार्थ्यांना संशोधन केंद्रांनी त्याच्या स्तरावर ई-मेल व दुरध्वनीद्वारे तसेच संशोधन केंद्र महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर मुलाखतीच्या वेळापत्रकाबाबत माहिती प्रसिद्ध करावी. विभागीय संशोधन समितीमधील दोन विषय तज्ज्ञ व अध्यक्षांनी मुलाखतीसाठी एकूण १०० पैकी गुणदान ऑनलाईन पद्धतीने करावे. त्यानंतर मुलाखतीचे गुण पीएच. डी. ट्रॅकिंग प्रणालीवर प्राप्त झाल्यानंतर लागू असल्यास पेट परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण यांचे एकत्रीकरण करून प्रणालीमार्फत गुणवत्ता यादी बीओडी लॉगीनमध्ये उपलब्ध होईल. संशोधन केंद्रांनी निवड केलेल्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रता तपासून ते प्रवेशासाठी पूर्ण पात्र असल्याची खात्री करावी, असे देखील डॉ. रासवे यांनी स्पष्ट केले आहे.

भरदुपारी झाडाच्या कुंडीने डोकं ठेचून तरुणाची हत्या

पुणे । प्रतिनिधी

कोंढव्यातील एका सराइत गुन्हेगाराचा लोखंडी शस्त्राने वार करून, डोके झाडाच्या कुंडीने ठेचून वडगाव परिसरात चार ते पाच जणांनी निर्घृण खून केला. तौकीर रफिक शेख (वय २३, रा. मक्का मज्जिद , कोंढवा) असे खून झालेल्याचे नाव आहे.

याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत सिंहगड रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. शवविच्छेदनासाठी तौकीर याचा मृतदेह ससून रुग्णालयात पाठवून देण्यात आला होता. ही घटना सोमवारी (दि.१७) दुपारी दोन वाजेच्या सुमारास वडगाव परिसरातील कृष्णकुंज इमारतीच्या पार्किंगमध्ये घडली आहे. याबाबत बोलताना सिंहगड रोड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिलीप दाइंगडे यांनी सांगितले, खून झालेला तरुण तौकीर हा रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. तो त्याच्या मित्रासोबत वडगाव परिसरात आला होता. त्यावेळी येथील कृष्णकुंज इमारतीच्या पार्किंगमध्ये चार ते पाच जणांच्या टोळक्याने लोखंडी पालघन आणि झाडाच्या कुंडीने त्याच्यावर हल्ला केला. पालघनने वार करून, डोके कुंडीने ठेचल्यामुळे गंभीर जखमी झालेल्या तौकीरचा जागीच मृत्यू झाला होता.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच सिंहगडरोड पोलिस ठाण्याचे पथक, गुन्हे शाखेची पथके त्याचबरोबर पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी घटनास्थळी भेट दिली. तौकीर याचा खून पूर्वीच्या वादातून झाला असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्याचा खून करणारे आरोपी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. त्यांच्या शोधासाठी पथके रवाना झाली असून, त्यांना पकडल्यानंतरच तौकीरचा खून नेमक्या कोणत्या कारणातून करण्यात आला हे समजेल, अशी माहिती दाइंगडे यांनी दिली.